सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -२४३ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि.२५ ऑक्टोंबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## पुण्यात पोलिसांच्या नाकाबंदीत १३८ कोटींचं सोनं पकडलं; सोनं आलं कुठून? तपास सुरु



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५ पुणे**

राज्यात सर्वत्र विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. निवडणुका पारदर्शक पद्धतीने पार पडाव्यात यासाठी निवडणूक आयोग दक्ष आहे. दरम्यान, पुणेपोलिसांना नाकाबंदी दरम्यान सहकार नगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत १३८ कोटी रुपयांचे सोने सापडले आहे. पोलिसांनी हे सोने जप्त केले असून, यासंदर्भात निवडणूक अधिकारी आणि आयकर विभागाला कळवण्यात आले असल्याची माहिती पोलिस उपायुक्त स्मार्तना पाटील यांनी दिली.

शहरातील विविध विधानसभा मतदार संघातील विविध ठिकाणी २४ तास नाकाबंदी करून वाहनांची तपासणी केली जात आहे. काही दिवसांपूर्वी खेड शिवापूर टोल नाक्यावर पुणे ग्रामीण पोलिसांनी ५ कोटींची रोकड जप्त केली होती. त्यानंतर मावळात पावणे अठरा लाखांची रोकड जप्त केली होती. त्यानंतर शुक्रवारी (दि. २५) सकाळी सहकार नगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत नाकाबंदी दरम्यान एका चारचाकी छोट्या टेम्पोत पोलिसांना हे सोने आढळले. पोलिसांनी सोन्यासह चालक आणि वाहन ताब्यात घेतले आहे. संबंधित कोट्यवधींचे सोने कुठून आले? कुणाले आहे? याबाबत याबाबतची कायदेशीर प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. संबंधित वाहन हे ट्रान्सपोर्टचे असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

## दिल्लीत जाताच मविआचा फॉर्म्युला बदलला; ठाकरे सेनेच्या जागा ९० झाल्या



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५नवी दिल्ली**

मविआ आणि महायुतीमध्ये जागावाटपावरून अजूनही रस्सीखेच सुरुच आहे. जवळपास ९० टक्के जागा वाटप झालेले आहे. बऱ्याच जागांवर उमेदवारही जाहीर झाले आहेत. आता राहिलेल्या जागांवरून दिल्लीत दोन्ही आघाडी-युतीच्या बैठका सुरु आहेत. ठाकरे गटासोबत काँग्रेसचा जागावाटपाचा तिढा आता दिल्ली दरबारी गेला आहे. आधी आलेला ८५-८५-८५ जागांचा फॉर्म्युला आता बदलला असल्याचे बाळासाहेब थोरात यांनी म्हटले आहे.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले आणि बाळासाहेब थोरात दिल्लीत गेले आहेत. यावेळी थोरात यांनी पत्रकारांना महाराष्ट्रातील महाविकास आघाडीचा नवा फॉर्म्युला सांगितला आहे. काँग्रेस, ठाकरे शिवसेना आणि शरद पवार राष्ट्रवादी या तीन पक्षांच्या जागा वाढून त्या ९०-९०-९० झाल्या आहेत. तर १८ जागा आम्ही मित्रपक्षांना दिल्या असल्याचे थोरात यांनी स्पष्ट केले.

महाविकास आघाडी कुठेही मैत्रीपूर्ण लढत करणार नाही. आमचे सक्षम असलेले उमेदवार आम्ही देणार आहोत. राज्याची निवडणूक आहे, काही अडचणी आहेत. त्या सोडविण्याचा प्रयत्न करत आहोत, असेही थोरात म्हणाले. मित्रपक्षांसाठी १८ जागा बाजुला ठेवलेल्या आहेत. त्यातूनही किती सुटतात ते पाहत आहोत. आमचा ८५-८५-८५ चा फॉर्म्युला वाढून आता ९० वर गेला आहे. काँग्रेस १०० च्या पुढे जाऊ शकते का याची बेरीज अद्याप केलेली नाही असेही थोरात यांनी स्पष्ट केले.

काँग्रेसनं ४८ जागांची यादी जाहीर केली. यामध्ये विद्यमान आमदारांना पुन्हा एकदा संधी देण्यात आली. महाविकास आघाडीकडून १५८ जागांवर उमेदवार जाहीर करण्यात आले होते. राष्ट्रवादी काँग्रेसच्या ४५, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं ६५ जागांवर उमेदवार जाहीर करण्यात आले आहेत. महाविकास आघाडीतील उर्वरित जागांवर उमेदवार कधी जाहीर होणार याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे.

## आदित्य ठाकरेंची एकूण मालमत्ता २३ कोटी,प्रतिज्ञापत्रात सविस्तर तपशील



एकूण मालमत्ता - २३ कोटी ४३ लाख (२०१९मध्ये १७ कोटी ६९ लाख)
स्थावर - ६ कोटी ४ लाख
जंगम - १७ कोटी ३९ लाख
गुन्हे नोंद - जमावबंदी आदेशाचा भंग केल्याप्रकरणी एक गुन्हा दाखल
शिक्षण - विधि शाखेची पदवी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५ मुंबई पासपोर्ट**

महाराष्ट्र विधानसभा निवडणूक अवघ्या महिन्याभरावर आली असताना राजकीय घडामोडींना वेग आला आहे. महाराष्ट्रात महायुती, महाविकास आघाडी, तिसरी आघाडी, वंचित बहुजन आघाडी, महाराष्ट्र नवनिर्माण सेना अशा सर्वच पक्ष व आघाड्यांकडून जागावाटप व उमेदवार निश्चितीची प्रक्रिया पार पाडली जात आहे. अनेक ठिकाणी उमेदवार जाहीर केले जात असून काही ठिकाणी इतर पक्षातून आलेल्या इच्छुकांची उमेदवारीही लागलीच जाहीर केली जात आहे. काही प्रमुख उमेदवारांनी २४ ऑक्टोबरचा गुरुपुष्यामृत योग साधून उमेदवारी अर्ज दाखल केले असून त्यातून त्यांच्या मालमत्तेबाबतचा तपशील समोर आला आहे.

२४ ऑक्टोबरला उमेदवारी अर्ज दाखल करणाऱ्यांमध्ये शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे आदित्य ठाकरे, राजन विचारे, भाजपाचे मंगलप्रभात लोढा, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे नजीब मुल्ला, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे जितेंद्र आव्हाड तर अपक्ष उमेदवार विजय नाहटा अशा काही नेत्यांचा समावेश आहे. या उमेदवारांनी दाखल केलेल्या अर्जासोबत जोडलेल्या प्रतिज्ञापत्रातून त्यांच्या वैयक्तिक मालमत्तेबाबतची माहिती समोर आली आहे. त्यात आदित्य ठाकरेंच्या मालमत्तेमध्ये गेल्या पाच वर्षांत जवळपास ६ कोटींची भर पडल्याचं स्पष्ट झालं आहे.

२०१९ साली पहिल्यांदाच निवडणूक लढवणारे उद्धव ठाकरेंचे पुत्र आदित्य ठाकरे यांची पाच वर्षांपूर्वी वैयक्तिक एकूण मालमत्ता १७ कोटी ६९ लाख रुपये होती. यावेळी त्यांनी सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रानुसार त्यांची एकूण वैयक्तिक मालमत्ता २३ कोटी ४३ लाख इतकी आहे. यामध्ये स्थावर मालमत्ता ६ कोटी ४ लाखांची आहे, तर जंगम मालमत्ता १७ कोटी ३९ लाख इतकी आहे. त्यामुळे गेल्या निवडणुकीच्या तुलनेत यावेळी गेल्या ५ वर्षांत आदित्य ठाकरेंच्या संपत्तीमध्ये ६ कोटींची वाढ झाल्याचं दिसून येत आहे. दरम्यान, आदित्य ठाकरेंनी विधि शाखेची पदवी घेतल्याचंही प्रतिज्ञापत्रात नमूद केलं आहे.

## उमेदवारी अर्ज भरण्यापूर्वी देवेंद्र फडणवीसांचे नागपुरात शक्तीप्रदर्शन

### विरोधकांचा पराभव करण्यासाठी लाडक्या बहिणी पुरेशा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५नागपूर**

राज्यात विधानसभेच्या रणधुमाळीला सुरुवात झाली असून राजकीय नेत्यांकडून एकमेकांवर टीका टीप्पणी केली जात आहे. अशातच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाविकास आघाडीला लक्ष करत विरोधकांचा पराभव करण्यासाठी लाडक्या बहिणी पुरेशा आहेत, असं विधान केलं आहे. तसेच सुनील केदार आणि नाना पटोलेंसारख्या काँग्रेसच्या नेत्यांनी लाडक्या बहिणीच्या तोंडचा घास पळवण्याकरिता प्रयत्न केले, अशा आरोपही त्यांनी केला. देवेंद्र फडणवीस यांनी आज नागपूर दक्षिण-पश्चिम विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी अर्ज भरला. तत्पूर्वी त्यांनी उपस्थितांना संबोधितही केलं.

आज नितीन गडकरी यांच्या नेतृत्त्वात नागपूरचा झालेला विकास लोक डोळ्याने बघत आहेत. राज्यात आम्हाला विकासासाठी केवळ ७ वर्ष मिळाली. या सात वर्षात आम्ही काँग्रेस राष्ट्रवादीच्या पूर्वीच्या १५ वर्षांपेक्षा जास्त काम केलं. जनतेच्या आशीर्वादाने मला मुख्यमंत्री होता आलं. विदर्भातही आपण मोठा परिवर्तन केलं. अनेक विकास प्रकल्प राबवले. त्यामुळे विदर्भाचही चित्र बदललं. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या आशीर्वादाने आम्ही नवमहाराष्ट्राची निर्मिती सुरु केली आहे, अशी प्रतिक्रिया देवेंद्र फडणवीस यांनी दिली.यावेळी बोलताना त्यांनी विरोधकांनाही लक्ष्य केलं. मी विरोधकांबाबत जास्त काही बोलणार नाही. विरोधकांचा पराभव करण्यासाठी लाडक्या बहिणी पुरेशा आहेत. ज्या लाडक्या बहिणीच्या तोंडचा घास पळवण्याकरिता सुनील केदार, नाना पटोलेंसारख्या काँग्रेसच्या नेत्यांनी नागपूरच्या न्यायालयात याचिका दाखल केली. त्या लाडक्या बहिणीच त्यांना पुरून उरतील, अशी टीका त्यांनी केली.दरम्यान, पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस यांनी यंदाच्या निवडणुकीत नागपूर दक्षिण पश्चिममधून विजयाचा विश्वासही व्यक्त केला. या निवडणुकीत सहाव्यांदा मला दक्षिण पश्चिमची जनता मला आशीर्वाद देणार आहे, असे ते म्हणाले.

## दहा महिन्यात एमपीडीएचे दशक, कुख्यात बिट्टू वर्षभरासाठी कारागृहात

### अजून तिघे रडारवर : विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमिवर प्रिव्हेंटिव्ह ॲक्शन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमिवर प्रिव्हेंटिव्ह क्शन म्हणून फ्रेजरपुरा हद्दीतील कुख्यात गुन्हेगार रूपेश ऊर्फ बिट्टु विनोद वानखडे (२३, रा. पंचशील नगर) याच्याविरूध्द एमपीडीएची कारवाई करण्यात आली. त्याला २४ ऑक्टोबर रोजी वर्षभरासाठी जिल्हा मध्यवर्ती कारागृहात स्थानबद्ध करण्यात आले आहे. यंदाच्या वर्षात दहा जणांविरूध्द एमपीडीएची कारवाई करण्यात आली असून, अन्य तिन ते चार जण पोलिसांच्या रडारवर आहेत.

कुख्यात गुन्हेगार रूपेश ऊर्फ बिट्टु विनोद वानखडे हा सन २०२२ पासुन गुन्हेगारी कार्यवाहीमध्ये लिप्त आहे. त्याच्याविरूध्द फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात अश्लील शिवीगाळ, गंभीर दुःखापत, गृह अतिक्रमण, घातक शस्त्र बाळगणे, अधिसुचना व हद्दपार आदेशाचे उल्लघंन असे एकुण १६ गुन्हे दाखल आहे. त्याच्याविरूध्द यापुर्वी प्रतिबंधक कारवई करण्यात आली. त्याला तडीपार सुध्दा करण्यात आले होते. तरी सुध्दा तो गुन्हेगारी क्षेत्रात सक्रिय असल्याने त्याच्याविरूध्द फ्रेजरपुऱ्याचे ठाणेदार निलेश करे यांनी एसीपी कैलास पुंडकर, उपायुक्त सागर पाटील व कल्पना बारवकर यांच्या मार्फत पोलीस आयुक्तालयात एमपीडीएचा प्रस्ताव पाठविला. एसीपी शिवाजी बचाटे व पोलीस निरिक्षक सिमा दाताळकर यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेतील एमपीडीए सेलमधील सहायक पोलीस निरिक्षक इम्रान नायकवडे, अंमलदार विनय गुप्ता, अजय मिश्रा. चेतन कराडे, विनोद इंगळे यांनी पुर्तता केली. त्यावर पोलीस आयुक्त नविनचंद्र रेड्डी यांनी २४ ऑक्टोबर रोजी आदेश पारीत केले. ठाणेदार करे यांनी ते आदेश तामिल करून त्याला स्थानबध्दतेच्या कालावधीकरीता मध्यवर्ती कारागृहात दाखल केले.


## यंदाही बच्चू कडूंची विजयी पताका फडकणार का ? अचलपूर मतदारसंघात होणार तिरंगी लढत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५ अमरावती**

राज्यात येत्या २० नोव्हेंबरला विधानसभा निवडणुकीसाठी मतदान होणार असून २३ नोव्हेंबरला मतमोजणी होऊन निकाल लागणार आहे. महायुती वि महाविकास आघआडी असा चुरशीचा सामना या निवडणुकीत रंगणार असून जनता कोणाला सत्ता स्थापन करण्याची संधी देते हे महिन्याभरातच समजेल. विधानसभा निवडणुकीचं बिगुल वाजल्यानंतर आता प्रत्येक राजकीय पक्षांकडून आपापल्या उमेदवारांची यादी जाहीर करण्यात येत आहे. अशातच राज्यातील तिसऱ्या आघाडीने आपल्या उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. बच्चू कडू, संभाजी राजे आणि राजू शेट्टी यांनी मिळून महाशक्ती ही तिसरी आघाडी स्थापन केली आहे. याच परिवर्तन महाशक्ती आघाडीच्या १० उमेदवारांची पहिली यादी काही दिवसांपूर्वीच जाहीर करण्यात आली . परिवर्तन महाशक्ती आघाडीने अचलपूरमधून बच्चू कडू यांना उमेदवारी जाहीर केली असून ते विजयी घोडदौड कायम राखतात का याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. या मतदारसंघात महायुतीतर्फे भाजपने प्रवीण तायडे यांना उमेदवारी दिली आहे. तर महाविकास आघाडीतून काँग्रेसच्या वाट्याला ही जागा आली असून अनिरुद्ध देशमुख यांना उमेदवारी मिळाली आहे. या तिरंगी लढतीत कोणाचा विजय होतो हे २३ नोव्हेंबरलाच स्पष्ट होईल.

अचलपूर हे महाराष्ट्रातील अमरावती जिल्ह्यातील एक शहर आहे. अचलपूर







विधानसभा मतदारसंघ हा महाराष्ट्र विधानसभेच्या २८८ मतदारसंघांपैकी एक आहे. बडनेरा, अमरावती, तिवसा , दर्यापूर (डउ) आणि मेळघाट (डढ) या पाच विधानसभा मतदारसंघांसह हा अमरावती लोकसभा मतदारसंघाचा एक भाग आहे.

**बच्चू कडू यांची विजयी घोडदौड कायम राहणार का ?**

बच्चू कडू यांनी २००४, २००९, २०१४ आणि २०१९ सालच्या विधानसभा निवडणुकांमध्ये यांनी लागोपाठ विजय मिळवला आहे. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत प्रहार जनशक्ती पार्टी पक्षातर्फे निवडणूक लढवत त्यांनी ८१ हजार २५२ मतं मिळवत विजय संपादन केला. काँग्रेस पक्षाचे अनिरुद्ध उर्फ बबलूभाऊ सुभानराव देशमुख हे ७२ हजार ८५६ मतं मिळवन दुसऱ्या स्थानी होते. यंदा बच्चू कडू यांचा सामना महायुतीतील भाजप उमेदवार प्रवीण तायडे आणि मविआचे काँग्रेसचे उमेदवार अनिरुद्ध देशमुख यांच्याशी होणार आहे.

**२०१९ विधानसभा निवडणूक निकाल**

बच्चू बाबाराव कडू - प्रहार जनशक्ती पार्टी - ८१,२५२ मतं
अनिरुद्ध उर्फ बबलूभाऊ सुभानराव देशमुख - काँग्रेस - ७२,८५६ मतं
सुनीता नरेन्द्राराव फिस्के - शिवसेना- १५,०६४ मतं
अब्दुल नाझिम अब्दुल रौफ - इतर - ६,३२९ मतं
नंदेश शेषराव अंबडकर - इतर - ३,३५५ मतं

**महायुतीत राहूनही दर्शवला होता विरोध**

महायुतीत राहूनही बच्चू कडू यांनी महायुतीविरोधी भूमिका देखील घेतली होती. काही महिन्यांपूर्वीच झालेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये भारतीय जनता पक्षाने अमरावती लोकसभा मतदारसंघातून नवनीत राणा यांची उमेदवारी जाहीर केली होती मात्र त्यास बच्चू कडू यांनी कडाडून विरोध दर्शवला होता. त्यानंतर बच्चू कडूंच्या प्रहार जनशक्ती पक्षातर्फे लोकसभेत नवनीत राणांविरोधात उमेदवार उभा करण्यात आला.

## संपादकीय ......

# लाडकी बहीण, महायुतीचे आधार कार्ड

विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी मिळविण्यावरून सर्वच राजकीय पक्षांत संघर्षाला उधाण आले आहे. यावेळी मोठ्या प्रमाणावर बंडखोरी होणार, याची सर्वच पक्षांना जाणीव आहे. विधानसभेत जाण्यासाठी पुढील पाच वर्षे थांबण्याची कोणाची तयारी नाही हे त्यामागचे खरे कारण आहे. बड्या नेत्यांचे सगेसोयरे, कुटुंबीय यांना उमेदवारी दिली जाते म्हणून नाराजी असली तरी त्या कुटुंबाची ताकद मोडून काढणे सोपे नाही हे वरिष्ठांना चांगले ठाऊक आहे. सत्ता मिळविण्यासाठी पक्षाला प्रत्येक आमदाराची गरज आहे. म्हणूनच निवडून येण्याची क्षमता असलेल्या इच्छुकालाच उमेदवारी देण्यात येत आहे. मॅन पॉवर, मनी पॉवर नि मसल पॉवर ज्याकडे हे तीन एम आहेत, त्याला पक्षाची उमेदवारी निश्चित मानली जाते. महाराष्ट्रात विधानसभेच्या २८८ जागा आहेत. लोकसभा निवडणुकीत राज्यात भाजपाला मोठा फटका बसला. भाजपा विरोधात मतदान झाले. विधानसभा निवडणुकीत पुन्हा महाआघाडीला यश मिळेल असे सर्वत्र वातावरण बनले. पण हरियाणा विधानसभेचे निकाल आले आणि राज्यात भाजपाला पुन्हा ऊर्जा मिळाली. हरियाणात काँग्रेस सत्तेवर येणार अशी सर्व सर्व्हेंची आकडेवारी सांगत असताना तेथील मतदारांनी पुन्हा भाजपाला सत्तेवर निवडून दिले. हरियाणात भाजपाने विजयाची हॅटट्रीक संपादन केली. लोकसभेत भाजपाला बहुमतापासून मतदारांनी दूर ठेवले तरी भाजपाची लोकप्रियता कमी झालेली नाही, हे हरियाणाच्या मतदारांनी दाखवून दिले.

हरियाणाच्या निकालाने महाआघाडीच्या नेत्यांना महाराष्ट्रात जमिनीवर आणण्याचे काम केले. विधानसभा निवडणुकीनंतर महाराष्ट्रात राजकीय स्थिरता असेल काय हा सर्वात महत्त्वाचा प्रश्न आहे. केंद्रात आपले सरकार आहे म्हणून निकालानंतर आपण कशाही सोंगट्या फिरवू शकतो असे आता भाजपाला करता येणार नाही. सन २०१९ ते २०२४ या पाच वर्षांत महाराष्ट्रातील राजकीय पक्षांनी अक्षरशः धुडगूस घातला. पाच वर्षांत तीन मुख्यमंत्री या राज्याने बघितले. देवेंद्र फडणवीसांचे ८० तासांचे सरकार, नंतर उद्धव ठाकरे यांचे अडीच वर्षांचे आघाडी सरकार व त्यानंतर एकनाथ शिंदे यांचे महायुतीचे सरकार या जनतेने अनुभवले आहे. विशेष म्हणजे कोणीही मुख्यमंत्री असले तरी अजितदादा पवार हे उपमुख्यमंत्री कायम आहेत, हा चमत्कारही याच पाच वर्षांत बघायला मिळाला. सलग पाच वर्षे मुख्यमंत्री राहिलेल्या देवेंद्र फडणवीस यांना एकनाथ शिंदे यांच्या सरकारमध्ये उपमुख्यमंत्री राहावे लागले, याची खदखद भाजपामधील त्यांच्या समर्थकांनी अनेकदा बोलून दाखवली. आता देवाभाऊंना भावी मुख्यमंत्री म्हणून त्यांच्या समर्थकांनी काही ठिकाणी फलकांवरही झळकवले. लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्राने महाआघाडीला झुकते माप दिले हाच भाजपाचा नि महायुतीचा मोठा पराभव होता.

राज्यात व केंद्रात सत्ता असून आणि उद्धव ठाकरे व शरद पवारांचे पक्ष फोडूनही भाजपाला लाभ मिळवता आला नाही. उलट सत्तेसाठी झालेली तोडफोड मतदारांना पसंत पडली नाही, हाच लोकसभा निकालाचा संदेश होता. राज्यात एकीकडे मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे यानी कंबर कसली आहे, भाजपाला निवडणुकीत धडा शिकविण्याची ते भाषा बोलत आहेत. विशेष म्हणजे आंदोलकांचे नेते शरद पवार, एकनाथ शिंदे किंवा अजितदादा पवार या दिग्गज मराठा नेत्यांवर एका शब्दाने टीका करीत नाहीत. त्यांचे निवडणुकीतील टार्गेट हे देवेंद्र फडणवीस आणि भाजपाचे उमेदवार आहेत. मराठा समाजाला शिंदे सरकारने दहा टक्के आरक्षण देऊनही आंदोलक नेत्यांचे समाधान झालेले नाही. मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळाले पाहिजे, हा हट्ट त्यांचा कायम आहे. मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्र द्यावे या मागणीपासूनही ते माघार घेण्यास तयार नाहीत. जरांगे यांनी मराठा आरक्षणासाठी आजवर सहा उपोषणे केली. त्यांच्या पाठीशी विशेषत: मराठवाड्यात मराठा समाज एकवटला आहे, हेच दृश्य वेळोवेळी बघायला मिळाले. मराठा समाजाची नाराजी नुकसानकारक ठरू नये यासाठी भाजपाला विशेष प्रयत्न करावे लागणार आहेत. हरियाणात जाट समाज काँग्रेसच्या पाठीशी एकवटला असल्याचे चित्र होते, तेव्हा भाजपाने बिगर जाट समाजाची मोट बांधून मोठी व्होट बँक उभी केली. तसेच महाराष्ट्रात बिगर मराठा समाजांना एकत्र आणणे ही भाजपाची मोठी कसोटी ठरणार आहे. धनगर समाजाला अपेक्षित आरक्षण मिळाले नाही म्हणून धुसफूस आहेच. शिवाय प्रहार संघटनेचे बच्चू कडू, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे राजू शेट्टी, छत्रपती संभाजी राजेंची स्वराज संघटना, अशी तिसरी आघाडी मैदानात उतरली आहे. राज ठाकरे यांची महाराष्ट्र नवनिर्माण सेना स्वबळावर रणसंग्रामात उतरली आहे. मुंबई, ठाणे, पुणे, नाशिकमध्ये महायुतीला किंवा महाआघाडीला मनसेकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. त्याशिवाय प्रकाश आंबेडकर यांची वंचित बहुजन आघाडी मते खेचणारच आहे. महायुतीत असूनही रामदास आठवले यांच्या पदरात काही भरीव पडलेले दिसत नाही. रोज १८ तास काम करणाऱ्या या नेत्याकडे दूरदृष्टी आहे. कामाचा झपाटा आहे. कमी वेळात विकासाची कामे मार्गी लावण्याचे कौशल्य आहे आणि उद्योग व्यवसायात प्रचंड गुंतवणूक त्यांनी महाराष्ट्रात आणली आहे. एवढी ऊर्जा, उत्साह, कार्यक्षमता, तत्परता त्यांच्याकडे येते कोठून? भाजपापेक्षा कोणत्या नेत्यापेक्षा आपण सरस आहोत हे त्यांनी आपल्या कामांनी सिद्ध करून दाखवले आहे. म्हणूनच मोदी-शहांचा थेट विश्वास संपादन करण्यात ते यशस्वी झाले आहेत. कार्यकर्ते संभाळणारा, लोकप्रतिनिधींची कामे विनाविलंब करणारा हा नेता आहे. शहरी व ग्रामीण भागातील जनतेला आपला नेता मुख्यमंत्रीपदावर आहे, असे वाटते, हीच त्यांच्या कामाची पावती आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना ही तर गेम चेंजर ठरणार आहे. लोकसभा निवडणुकीत महायुतीचे झालेले नुकसान लाडकी बहीण भरून काढणार आहे. या योजनेमुळे दोन कोटी तीस लाख बहिणींची व्होट बँक एकनाथ शिंदे यांनी आपलीशी केली आहे. लाडकी बहीण योजनेने महाआघाडीला धडकी भरली आहे. आपण लाडक्या बहिणींना दरमहा तीन हजार रुपये देऊ, या आश्वासनाने बहिणी सुखावल्या आहेत. ही योजना बंद होणार नाही, हा फार मोठा दिलासा एकनाथ शिंदे यांनी दिला आहे. लाडकी बहीण योजनेच्या श्रेयवादावरून महायुतीत चढाओढ असली तरी हीच योजना हे महायुतीचे आधार कार्ड ठरणार आहे.

# 'हे' लागवड तंत्र वापरा, हरभरा पिकाचे उत्पादन वाढवा

**दि.२५विदर्भ प्रजासत्ताक**




हरभरा हे पीक व्यवस्थापनास अतिशय उत्तम प्रतिसाद देणारे पीक आहे. तसेच रब्बी हंगामात घेण्यात येणाऱ्या विविध पिकांच्या तुलनेत हरभरा हे पीक सर्वात जास्त आर्थिकदृष्ट्या फायदेशीर ठरणारे असे पीक आहे.

हरभरा पिकासाठी विशिष्ट अवस्थेत योग्य हवामान मिळण्यासाठी हरभरा पिकाची पेरणी २० ऑक्टोबर ते १० नोव्हेंबर दरम्यान करावी. पिकास जास्त प्रमाणात पाणी दिले गेले अथवा पीक उभे असताना जास्त प्रमाणात दीर्घ कालावधीसाठी जमिनीत ओलावा राहिला तर मोठ्या प्रमाणात मर होते. हे टाळण्यासाठी हरभरा पिकाची लागवड सरी-वरंबा पद्धतीवर करावी.

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

त्यासाठी शेतात सरसकट ३ फूट अंतरावर सऱ्या पाडाव्यात. वरंब्याच्या दोन्ही बगलेस, ७ ते ८ सेंटीमीटर अंतरावर, वरंब्याच्या मध्यावर टोकण पद्धतीने हरभऱ्याची लागवड करावी. या पद्धतीने लागवड करताना मजुरीवर निश्चित खर्च होतो. परंतु प्रचलित हरभरा लागवड पद्धतीच्या तुलनेत ३० टक्के बियाणे कमी लागते.

हे लक्षात ठेवा..

देशी हरभऱ्यामध्ये विजय, विशाल, दिग्विजय, फुले विक्रम/विक्रांत/विश्वराज हे मर रोग प्रतिकारक्षम वाण तसेच काबुली हरभऱ्याचे विराट, विहार, पिकेव्ही २/४, कृपा हे वाण लागवडीसाठी शिफारस केलेले आहेत.

विजय जातीचे हेक्टरी ६५ ते ७० किलो तर विशाल, दिग्विजय, विराट, पिकेव्ही २/४, कृपा या जातीचे हेक्टरी १०० किलो बियाणे वापरावे. पेरणीचे अंतर ३०१० सेंटीमीटर ठेवावे.

पेरणीपूर्वी प्रति किलो बियाणास २ ग्रॅम थायरम + २ ग्रॅम कार्बेडेंझिम किंवा ५ ग्रॅम ट्रायकोडर्माची बीजप्रक्रिया करावी. त्यानंतर प्रति किलो बियाणास २५ ग्रॅम रायझोबियम गुळाच्या थंड द्रावणामध्ये (१ लिटर पाण्यात १०० ग्रॅम गूळ मिसळून बनवलेले) चोळावे. तासभर बियाणे सावलीत सुकवून नंतर पेरणी करावी.

हरभरा पिकाला प्रति हेक्टरी २५ किलो नत्र, ५० किलो स्फुरद आणि ३० किलो पालाशची आवश्यकता असते. त्यासाठी हेक्टरी १२५ किलो डीएपी व ५० किलो म्यूरेट फ पोटॅश पेरणीच्या वेळी दुचाडी पाभरीने पेरुन द्यावे, विस्कटून टाकू नये.

– डॉ. कल्याण देवळाणकर, सेवा निवृत्त कृषी विद्यापीठ शास्त्रज्ञ

# देशातील २१ वी पाळीव पशुगणना नोव्हेंबर ते फेब्रुवारी या कालावधीत पार पडणार

## '21 Live Stock census' या नावाने प्लिकेशन तयार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५ अमरावती**



आपल्या देशातील जनतेची जशी जनगणना केली जाते तशीच पाळीव पशुंची देखील जनगणना केली जाते. यंदाच्या वर्षी २१ वी पशुगणना केली जाणार आहे. त्याचे उद्घाटन आज नवी दिल्ली येथे होणार आहे. '२१ डव्हींश डींलज्ञ लशपींीि' या नावाने प्लिकेशन तयार करण्यात आले आहे.

त्यासाठी मत्स्योद्योग, पशुपालन आणि दुग्ध व्यवसाय मंत्रालयांतर्गत येणाऱ्या पशुपालन आणि दुग्ध व्यवसाय विभागाने राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांसाठी यावर्षी होणाऱ्या पाळीव पशुगणनेसाठी महत्वाच्या कार्यशाळेचे आयोजनही करण्यात आले होते.

या कार्यशाळेच्या माध्यमातून प्रगणक आणि पर्यवेक्षक यांना ऑगस्ट महिन्यात प्रशिक्षण देण्यात आले होते. सदर प्रशिक्षण कार्यक्रम २६ ते २९ ऑगस्टदरम्यान आयोजित करण्यात आला होता. या कार्यशाळेमध्ये प्रगणक आणि पर्यवेक्षक यांना २१ डव्हींश डींलज्ञ लशपींीि या प्लिकेशनची संपूर्ण माहिती देण्यात आली आहे. यात विविध प्रकारच्या पशुंसाठी त्याच्या प्रकारानुसार प्रश्नावली तयार करण्यात आली आहे. यात मुख्यत: दुधाळ जनावरे आणि गाय वर्ग, म्हैस वर्ग, शेळी-मेंढी, अश्व, वराह असे विभाग करण्यात आले आहे. त्या प्रकारानुसार प्रगणकांनी अचूक माहिती भरावी लागणार आहे. यंदा २१ वी पशुगणना केली जाणार आहे. पशुगणनेसाठी पशुसंवर्धन विभाग सज्ज आहे. २१ व्या पशुगणनेसाठी छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील पशुसंवर्धन विभाग सज्ज झाला आहे. यंदा प्रगणकांना मोबाइलवर पशुधनाची माहिती भरावी लागणार आहे. त्यासाठी शासन प्रगणकांना मानधन, मोबाइल वापराचा वेगळा मोबदला देण्यात येणार आहे. पशुगणनेंतर्गत ग्रामीण भागात, मनपा व नगरपालिका या शहरी भागातील पशुंचे सर्वेक्षण केले जाणार आहे.

**२१ वी पशुगणना मोबाईल पद्वारे होणार**

पशुगणनेमध्ये पाळीव पशुंची माहिती आणि आकडेवारी अचूक प्राप्त व्हावी, यासाठी मोबाईल ॲपचा वापर करण्यात येणार आहे. मोबाईल ॲपचा वापर कसा करावा? याची माहिती आयोजित कार्यशाळेत प्रगणकांना देण्यात आली आहे.

नोव्हेंबर ते फेब्रुवारी २०२५ या दरम्यान होणार गणना

२१ वी पशुगणना ही साधारणत: नोव्हेंबर ते फेब्रुवारी या कालावधीत पार पडणार आहे. या गणनेसाठी प्रथमच मोबाईल ॲपचा वापर करण्यात आला असून देशातील शहरी आणि ग्रामीण भागातील पशुंची अचूक माहिती गोळा केली जाणार आहे. त्यासाठी शहरी भागासाठी आणि ग्रामीण भागासाठी प्रगणक आणि पर्यवेक्षक यांची नेमणूक करण्यात आली आहे.

**१९१९ मध्ये झाली पहिली पशुगणना**

सन १९१९-२० पासून देशात पशुगणनेस सुरूवात करण्यात आली. आतापर्यंत २० पशुगणना मोहिम आयोजित करण्यात आल्या होत्या. तेव्हापासून ही गणना दर ५ वर्षांनी एकदा केली जाते. राज्य सरकार आणि केंद्रशासित प्रदेशांच्या सहकार्याने मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय विभागाने आतापर्यंत अशा २० जनगणना केल्या आहेत. पशुगणना केवळ धोरणकर्त्यांसाठीच नव्हे तर शेतकरी, व्यापारी, उद्योजक, दुग्धउद्योग आणि सर्वसामान्यांसाठी उपयुक्त ठरणार आहे.

**या मोहिमेत 'या' जनावरांची गणना**

गाय वर्ग, म्हैस वर्ग, शेळी-मेंढी, अश्व, वराह, घोडा, उंट, कुत्रा, कोंबडी, गाढव यांची गणना केली जाणार आहे. मागील पशुगणनेत जिल्ह्यात गाय वर्ग- ५ लाख ३४ हजार ३९४, म्हैस वर्ग- ९२ हजार ४९४, शेळ्या- ४ लाख १५ हजार २१९, मेंढ्या ८७ हजार २४०, वराह- १० हजार ६४६, असे एकूण ११ लाख ३८ हजार ९९३ पशुधन गणना झाली होती.

### पशुगणना पशुंसाठी उपयोगी

पशुगणनेच्या माध्यमातून आपल्याला कोणत्या प्रकारातील किती पशु आहेत. याची संपूर्ण माहिती मिळेल. त्यानुसार येत्या काळात लसीकरण मोहिम, औषध, गोळ्याची मागणी आणि पुरवठा करण्यात येणाऱ्या अडचणी दूर होतील. भविष्यात त्यातच तुलनेत साठवणूक करण्याचे नियोजन पशु विभागाला करण्यास सोपे जाणार आहे. त्याचा उपयोग पशुंना नक्की होईल.




# मोड आलेल्या मेथ्या म्हणजे सुपरफूड! डॉक्टर सांगतात, कोवळी मेथी लागेल कडू पण खा कारण..

**दि.२५विदर्भ प्रजासत्ताक**




प्रत्येक स्वयंपाक घरात मेथ्या किंवा मेथी दाणे असतातच. पण ते आपण खूपच कमी पदार्थांमध्ये वापरतो. त्यामुळे त्या बऱ्याच कमी प्रमाणात खाल्ल्या जातात. खरं तर मेथ्या एवढ्या आरोग्यदायी आहेत की त्या आपण दररोज थोड्या का होईना पण खायलाच पाहिजेत, असं तज्ज्ञ नेहमीच सांगतात. पण त्यांच्या कडवट चवीमुळे मात्र आपण त्या टाळतो. जर मेथ्या रात्रभर पाण्यात भिजत ठेवल्या आणि दुसऱ्या दिवशी त्या इतर कडधान्यांप्रमाणे मोड आणून खाल्ल्या तर त्यांचा कडवटपणा अजिबात जाणवत नाही. काही डॉक्टरांच्या मते मोड आलेल्या मेथ्या हे खऱ्या अर्थाने सुपरफूड आहे. बघा ते खाल्ल्यामुळे आरोग्याला नेमके काय फायदे होतात...

मोड आलेल्या मेथ्या खाण्याचे फायदे

मोड आलेल्या मेथ्यांमधून व्हिटॅमिन्स, मिनरल्स, एंटीऑक्सिडंट्स भरपूर प्रमाणात मिळतात. विशेषत: व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन ए आणि व्हिटॅमिन बी साठी तर मोड आलेल्या मेथ्या हा एक उत्तम स्त्रोत आहे.

२. मोड आलेल्या मेथ्यांमधून योग्य प्रमाणात फायबर मिळत असल्यामुळे पचनाचे अनेक त्रास कमी होतात. ज्यांना नेहमीच कॉन्स्टीपेशनचा त्रास होतो, त्यांनी मोड आलेल्या मेथ्या नियमितपणे खायला पाहिजेत.

३. रक्तातील साखरेचे प्रमाण तसेच कोलेस्ट्रॉल नियंत्रित ठेवण्यासाठी मोड आलेल्या मेथ्या खाणे फायदेशीर ठरते. त्यामुळे मधुमेह असणाऱ्यांनी तर त्या आवर्जून खायलाच पाहिजेत, असं डॉक्टर सांगतात.

४. मेथी दाण्यांमधून भरपूर प्रमाणात एंटीऑक्सिडंट्स आणि एंटी इन्फ्लामेटरी कम्पाउंड मिळतात. त्यामुळे शरीरावर आलेली सूज बऱ्याच प्रमाणात कमी होण्यास मदत होते. एंटी ऑक्सिडंट्स शरीरात पुरेशा प्रमाणात असतील तर आपोआपच अनेक आजारांचा धोका कमी होतो.

५. मेथी दाण्यांमधून भरपूर प्रमाणात कॅल्शियम मिळते. त्यामुळे हाडांची दुखणी नको असतील तर त्यांच्या बळकटीसाठी नियमितपणे मोड आलेल्या मेथ्या खायला सुरुवात करा...

# निवडणुकीत काळ्या पैश्याचा व्यवहार रोखण्यासाठी मतदारांनी माहिती द्यावी

## प्राप्तीकर विभागाचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५ अमरावती**

विधानसभा निवडणुकीत काळ्या पैश्याचा वापर रोखण्यासाठी मतदारांनी पुढाकार घेऊन माहिती देण्याचे आवाहन नागपूर येथील प्रधान प्राप्तीकर संचालक कार्यालयाचे उप प्राप्तीकर संचालक अनिल खडसे यांनी केले आहे. माहिती देणाऱ्यांची ओळख गुप्त ठेवण्यात येणार आहे.

विधानसभा निवडणुकीत काळा पैसा वापरल्या जात असल्याची माहिती, रोख रकमेचे वाटप, रोख रकमेची हालचाल याबाबत माहिती देण्यात संकोच करू नये. पुढाकार घेऊन माहिती देण्याचे राष्ट्रीय कर्तव्य पार पाडावे. प्राप्तिकर विभागाच्या टोल फ्री क्रमांक १८०० २३३ ०३५५ किंवा १८०० २३३ ०३५६ या क्रमांकावर माहिती कळवावी, तसेच व्हाटस पद्वारे छायाचित्र, व्हिडिओ ९४०३३९०९८० या क्रमांकावर पाठवावा. त्याचप्रमाणे, nagpur.addldit.invincometax.gov.in किंवा nashik.addldit.invincometax.gov.in या ई मेल पत्त्यावर माहिती पाठविता येईल, असे आवाहन करण्यात आले आहे.




RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

# विदर्भ प्रजासत्ताक

शुक्रवार दि. २५ ऑक्टोबर २०२४

शहर/ग्रामिण

# विटाभट्टीधारकांना पर्यायी जागा मिळवून देणार - आ.रवी राणा



विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२५ बडनेरा** टेलीग्रामकोंडेश्वर परिसरात गत अनेक वर्षापासून बडनेरा, अंजनगाव बारी तसेच परिसरातील शेकडो विटभट्टीधारकाच्या विटभट्या असून या विटभट्टीच्या भरोशावरच विटभट्टी धारकांचे कुटुंब तसेच या विटभट्टीवर काम करणाऱ्या शेकडो मजुरांच्या कुटंबाचे पालनपोषण होत आहे. आता मात्र या भागात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय होऊ घातल्याने विटभट्या हटविण्यात येणार आहे. याविटभट्टीधारकां साठी झोन तयार करून पर्यायी जागा शासनाकडून उपलब्ध करून दिली जाईल, अशी ग्वाही आमदार रवी राणा यांनी दिली. परिसरातील विटाभट्टीधारक व संबधित ३०० कुटुबांना वाऱ्यावर सोडणार नाही. विटाभट्टी धारकांसाठी नवीन जागा देवून विटाभट्टी झोन तयारकरण्याचे वचन आ. रवि राणा यांनी उपस्थितांना दिले. याप्रसंगी आ.रवि राणा यांचा विटभट्टी धारक असोसिएशनतर्फे सत्कार करण्यात आला. यावेळी देविदासबांडाबुचे, जाकिर जमाल, मोहन दरोळी, शेख नूर, संजय माहूरे, रउफ पटेल, शाकिरभाई, जावेद भाई, यादव भाई, मुकेश उसरे, किरण म. अंबाडकर, अजमतभाई, वसीम खान, अनुप वासेवाय, अंकुश पकळे, माधव गोडाने, मोहन अंबाडकर, अमोल वासेवाय, रवि संभे, सुधीर अंबाडकर, दिलीप लोणारे, बाळु ठवकर, प्रविण संभे, प्रविण दुधे, अजय मोरवाल, बंडू खांडेकर, मोहम्मद साजित, कैलाश रोतडे, विनोद दरोळी, इरफान शहा, नितीन दरोळी, मोहम्मद समीर, निखील तेटू, प्रभु सुने, पंजाब खोब्रागडे, सुर्यभान पंचारे, वसीम खान, शफी खान, सागर नागमोते, जयंत दारोकार, सुभाष पोकडे तसेच मजुर उपस्थित होते.

# अभिजीत अडसूळ यांचा बेडूक म्हणून केला उल्लेख

## कांदिवली येथून आलेलं पार्सल पाडा- आम रवी राणा

### दर्यापूर मध्ये युवा स्वाभिमान- भाजप मेळावा




*विदर्भ प्रजासत्ताक*

*दि.२५ दर्यापुर - कांदिवली येथून येऊन कोणी निवडणूक लढवत असेल तर त्याला पाडा. बाहेरचं, कांदिवलीच पार्सल आपल्या कामात येणार नाही, असा घणाघात आमदार रवि राणा यांनी महायुतीतर्फे शिवसेनेचे (शिंदे) उमेदवार कॅप्टन अभिजित अडसूळ यांच्यावर दर्यापूर येथे केला.*

*युवा स्वाभिमान पार्टी आणि भारतीय जनता पार्टी पदाधिकारी व कार्यत्यांच्या मेळाव्यात आमदार रवी राणा यांनी उपरोक्त हल्लाबोल केला.दर्यापूरच्या हॉटेल राईस इनमध्ये युवा स्वाभिमान व भाजपा मित्र पक्षातर्फ गुरूवारी (ता. २४) हा मेळावा पार पडला. दर्यापूर येथील भाजपाचे संपूर्ण पदाधिकारी या मेळाव्याला उपस्थित होते.राज्याच्या मुख्यमंत्र्याला अडसूळ पिता-पुत्रांनी ब्लॅकमेल केल्याचा आरोप रवि राणा यांनी केला. माझ्या मुलाला महायुतीची उमेदवारी दिली नाही तर मी दुसऱ्या पक्षात जाईल, अशीकांदिवली येथून आलेलं पार्सल पाडा- आमदार रवी राणा भूमिका आनंदराव अडसूळ यांनी मुख्यमंत्र्यांकडे घेतली होती, असे रवि राणा म्हणाले. दर्यापूर मतदारसंघात बाहेरचं पार्सल चालणार नाही. दर्यापूर-अंजनगाव मतदारसंघासाठी व विकासासाठी कटिबद्ध रमेश बुंदीले सक्षम आहेत, त्यांना निवडून आणायचे आहे, असे आमदार रवी राणा म्हणाले. कोरोना काळात अडसूळ पिता-पुत्र मुंबईला घरात बसले होते. ते आपल्या कामात येणार नाहीत म्हणून आपल्याला स्थानिक आमदार असणे खूप महत्वाचे आहे, असे म्हणत आमदार रवी राणा यांनी अभिजित अडसूळ यांचा उल्लेख बेडूक म्हणून केला. या मेळाव्याला दर्यापूर तालुक्यातील संपूर्ण भाजपाचे पदाधिकारी व युवा स्वाभिमान पार्टीचे कार्यकर्ते व महिला उपस्थित होत्या.*

# 33 केव्ही लोणी टाकळी विद्युत उपकेंद्राला आय.एस.ओ.मानांकन

## आय.एस.ओ.मानांकन मिळवणारे जिल्ह्यातील पहिले विद्युत उपकेंद्र

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५अमरावती-** ग्राहकांना गुणवत्तापूर्ण आणि अखंडित सेवा देण्यासाठी उपकेंद्राचे अत्यंत उत्कृष्टरित्या सक्षमीकरण आणि नूतनीकरण करण्यात आल्यामुळे जिल्ह्यातील लोणी (टाकळी) या ३३ /११ केव्ही विद्युत उपकेंद्राला खडज ९००१:२०१५ मानांकन मिळाले आहे.विशेष म्हणजे आय.एस.ओ.मानांकन मिळणारे हे जिल्ह्यातीलच नव्हे तर अमरावती परिमंडळातील पहिले उपकेंद्र आहे.त्यामुळे परिमंडळासाठी ही अत्यंत अभिमानास्पद बाब असल्याचे प्रतिपादन मुख्य अभियंता ज्ञानेश कुलकर्णी यांनी केले.जिल्ह्यातील अमरावती ग्रामीण विभागा अंतर्गत लोणी (टाकळी) येथील उपकेंद्रात आयोजित विद्युत उपकेंद्रांना आयएसओ मानांकन मिळाल्याबद्दल आयोजित सत्कार समारंभात मुख्य अभियंता ज्ञानेश कुलकर्णी बोलत होते. यावेळी अधीक्षक अभियंते दिपक देवहाते,दिपाली माडेलवार,सहाय्यक महाव्यवस्थापक रूपेश देशमुख ,कार्यकारी अभियंता अनिरूध्द आलेगावकर,उपविधी अधिकारी प्रशांत लहाने,उपकार्यकारी अभियंता जयंत घाटे उपस्थित होते.मुख्य अभियंता म्हणाले की, 'इज ऑफ लिव्हिंग' अर्थात ग्राहकांचे जीवनमान उंचावण्यासाठी वीज हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. त्यामुळे ग्राहकांना दर्जेदार वीजपुरवठा करणे ही महावितरणची जबाबदारी आहे. आय.एस.ओ. मानकानुसार उपकेंद्रात झालेल्या उत्कृष्ट कामाचा फायदा ग्राहकांना दर्जेदार सेवा देण्याकरीता होणार आहे.या उपकेंद्रासाठी कर्मचाऱ्यांनी स्वयंस्फूर्तीने केलेल्या उत्कृष्ट कामातून प्रेरणा घेत इतर




विभागातील अधिकारी ,कर्मचारी यांनी आप-आपल्या क्षेत्रात पूर्ण क्षमतेने उत्कृष्ट काम करण्याचे आवाहन मुख्य अभियंता ज्ञानेश कुलकर्णी यांनी केले. उपकेंद्राला सर्वोत्कृष्ट मानांकन मिळवायचेच या ध्येयाने उपविभाग प्रमुख अभियंता जयंत घाटे आणि उपकेंद्रातील सर्व कर्मचारी, सुरक्षा रक्षक, बाह्यस्रोत कर्मचारी यांनी एकसंघपणे अथक परिश्रम घेतले याबद्दल सर्वांचे कौतुक करण्यात आले.अधीक्षक अभियंता दिपक देवहाते म्हणाले की कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेत उपकेंद्रात केलेली कामे आय.एस.ओ.च्या मापदंडावर खरी उतरली आहे.आय.एस.ओ. मानांकनासाठी आवश्यक सर्व सुधारणा लोणी ( टाकळी ) उपकेंद्राने आलेल्या अडचणींचा यशस्वी सामना करत केवळ सहा महिन्यात पूर्ण केल्या असल्याचे कार्यकारी अभियंता अनिरूध्द आलेगावकर यांनी सांगीतले.यावेळी आय.एस.ओ. मानांकन प्राप्त करण्यासाठी स्वयंस्फूर्तीने उत्कृष्ट योगदान दिल्याबद्दलसहाय्यक अभियंता सुदाम पाकधाने, वरिष्ठ यंत्रचालक संतोष कल्हाने, यंत्रचालक योगेश मारोटकर,धनराज सदिया,हरिदास ढेकले,शिंदे,भटकर आणि आळसपुरे यांचा मुख्य अभियंता यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी कार्यकारी अभियंते अमित शिवलकर,संजय सराटे,अमित बुटे,प्रणाली विश्लेषक राजेश दाभणे,व्यवस्थापक विकास बांबल यांच्यासह अधिकारी अभियंते उपस्थित होते.कार्यक्रमाला एका सुत्रात बांधण्याचे काम सुजाता जवंजाळकर यांनी केले आणि आभार अभियंता सुदाम पाकधाने यांनी मानले.

# निवडणूक कर्मचाऱ्यांना टपाली मतपत्रिकेद्वारे मतदानाची सुविधा

## कर्मचाऱ्यांनी कागदपत्रे सादर करण्याचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५अमरावती-**विधानसभा निवडणुकीत कर्तव्यावरील सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांना टपाली मतपत्रिकेद्वारे मतदान करण्याची सुविधा देण्यात येणार आहे. यासाठी आवश्यक कागदपत्रे प्रशिक्षणाच्या दिवशी सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चा कार्यक्रम जाहीर झाला आहे. त्याअनुषंगाने निवडणूक कर्तव्यावर असणाऱ्या अधिकारी, कर्मचारी यांचे प्रथम प्रशिक्षण दि. २६ ऑक्टोबर २०२४ रोजी



परतवाडा येथील अंबिका लॉन येथे सकाळी १० वाजता आयोजित करण्यात आले आहे. तेव्हा सदर प्रशिक्षणाला येणाऱ्या अधिकारी, कर्मचारी यांना टपाली मतपत्रिकेद्वारे मतदान करता यावे, यासाठी नमुना-१२ देण्यात येणार आहे.

सदर नमुन्यासोबत निवडणूक कर्तव्याचा आदेश, मतदान ओळखपत्र, तसेच अद्यावत मतदारयादीतील नाव असलेल्या पानाची प्रत, यादी भाग क्रमांक व अनुक्रमांक माहिती जोडणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर प्रशिक्षणावेळी संबंधित कागदपत्रांची झेरॉक्स प्रत सोबत आणावी, असे निवडणूक निर्णय अधिकारी ४२ - अचलपूर विधानसभा मतदार संघ कार्यालयाने कळविले आहे.

# राणानगर येथे बनावट पनीर तयार करणाऱ्या कारखान्यावर धाड

## पामतेल, वनस्पती तेलाचा केला जात होता वापर, ८ किलो पनीर जप्त

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५ अमरावती-** टेलीग्रामस्थानिक राणा नगर येथे बनावट पनीर तयार करणाऱ्या कारखान्यावर जिल्हा दूध भेसळ समितीने गुरूवारी (ता. २४) धाड टाकली. याठिकाणी पनीर तयार होत असल्याचे समिती सदस्यांना आढळून आले. एका खोलीत पनीर तयार करण्याकरिता पामतेल व वनस्पती तेलाचा वापर करण्यात येत असल्याचे यावेळी आढळून आले. विशाल तिवारी नामक व्यक्तीकडून हा गोरखधंदा सुरू होता. येथून समितीने एकूण ५२,७०० रुपयांचे वनस्पती तेल, पामतेल तूप व त्यापासून तयार केलेले ८ किलो पनीर जप्त केले. ही कारवाई दूध भेसळ समितीचे अध्यक्ष अपर जिल्हाधिकारी सुरज वाघमारे व सहायक आयुक्त फूड भाऊराव चव्हाण यांच्या मार्गदर्शनात अन्न

सुरक्षा अधिकारी गजानन गोरे, संदीप सूर्यवंशी, पशुधन विकास अधिकारी डॉ. तुषार गावंडे व दुग्धशाळा व्यवस्थापक विनोद पाठक यांनी केली.



# सोशल मीडियावर अल्पवयीन मुलीचा व्हिडिओ व्हायरल, दोघांवर गुन्हा दाखल

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२५अमरावती-** आपल्या मित्रासोबत एकांतात बसलेल्या अल्पवयीन मुलीला धाक दाखवून दोघांनी तिचा आक्षेपार्ह व्हिडिओ काढला व तिच्या मित्राच्या खिशातील रक्कम हिसकावून त्यांना पळवून लावल्याची घटना दीड वर्षांपूर्वी शहरातील एका पडक्या इमारतीत घडली होती. दरम्यान मागील काही दिवसात तो आक्षेपार्ह व्हिडीओ समाज माध्यमांवर व्हायरल झाल्याने तिच्या तक्रारीवरून दोन्ही आरोपितांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मार्च २०२३ मध्ये एका अल्पवयीन मुलीने आपल्या जवळीक असलेल्या मित्राला भेटण्यासाठी शहरातील पडक्या स्थितीत असलेल्या एका शासकीय इमारती जवळ सायंकाळ च्यावेळी बोलावले. निर्जंस्थळी असलेल्या या इमारतीच्या पायरीवर बसून दोघेही गप्पा करीत असताना अचानक एक विधी संघर्षित बालक एका युवकाला घेऊन तिथे पोहोचलात्या बालकाने तिला चाकूच्या धाकावर तेथून उठवले व तिला त्याच इमारतीमधील खोलीत नेऊन तिचे आक्षेपार्ह व्हिडीओ काढले. दरम्यान सोबत असलेल्या तिच्या मित्रालासुद्धा धमकावून त्याच्या खिशातील असलेली सातशे रुपये रक्कम हिसकावून घेतली. त्यावेळी ती व तिच्या मित्राने कसेवसे स्वतः ला सोडवून तिथून पळ काढला. तब्बल दीड वर्षानंतर संबंधित घटनेतील विधी संघर्षित बालकाने पुन्हा तिच्या मित्राला रस्त्यात अडविले व पैश्याची मागणी केली, परंतु त्याने नाकारल्याने १९ ऑक्टोंबरदरम्यान तिचा आक्षेपार्ह व्हिडिओ समाजमाध्यमांवर व्हायरल झाल्याचे दोघांनाही समजले असता तिने कुटुंबीयांना घेऊन दत्तापूर पोलीस स्टेशन गाठले. पीडितेच्या तक्रारीवरुन विधी संघर्ष बालक व एका एका युवकावर विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# खर्च निरीक्षकांच्या चेकपोस्टला भेटी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५अमरावती-** विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्ह्यात नियुक्त खर्च निरीक्षकांनी चेकपोस्टला भेट दिली. यावेळी त्यांनी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर वाहनांची कसून तपासणी करण्याचे निर्देश दिले.

खर्च निरीक्षक वेंकन्ना तेजावथ यांनी अमरावती, बडनेरा आणि तिवसा मतदारसंघातील विविध ठिकाणी भेटी दिल्या. खर्च निरीक्षक वेंकन्ना तेजावथ यांनी अमरावती, बडनेरा, तिवसा मतदारसंघातील उराड चेकपोस्ट, रवाळा चेकपोस्ट स्थिर संनियंत्रक पथकाला (चेकपोस्ट) भेट देऊन तपासणी केली. निवडणूक कालावधीत प्रत्येक वाहनाची कसून तपासणी करण्याचे निर्देश दिले. यावेळी संपर्क अधिकारी प्रमोद पालवे, सहायक खर्च निरीक्षक चेतन देशमुख उपस्थित होते.

खर्च निरीक्षक डॉ. उमा माहेश्वरी यानी मोर्शी, दर्यापूर, अचलपूर मतदरसंघातील स्थिर



सनियंत्रक पथकाला भेट देऊन तपासणी केली. यावेळी त्यांनी स्थिर पथकाला करावयाच्या कार्यवाही बद्दल निर्देश दिले. यावेळी संपर्क अधिकारी मोहिनी ढोंडे उपस्थित होते.

### शिक्षक समितीच्या मागणीला यश

# दिवाळी पूर्वी शिक्षकांना मिळणार वेतन-शासन आदेश निर्गमित

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती** - दिवाळी हा महत्वाचा सण असल्यामुळे माहे ऑक्टोबरचे वेतन दिवाळी पूर्वी दयावे या करीता महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे,राज्य सरचिटणीस राजन कोरगावकर यांनी ९ऑक्टोबरला शालेय शिक्षण मंत्री,शिक्षण संचालक,शिक्षण आयुक्त यांना निवेदन सादर केले होते.

या मागणीची दखल घेत शासनाने काल निधीची तरतुद करुन निधी सर्व जिल्हा परीषदला पाठविला होता तर आज सर्व कर्मचार्यांचे २५ऑक्टोबरला वेतन करण्याचे आदेश निर्गमित केले त्यामुळे सर्व कर्मचारी यांच्यामध्ये खुशीचे वातावरण आहे.पण दर वर्षाला सणा निमित्य सण अग्रिम मिळत असतो पण या सण अग्रिमचे शासन आदेश आले नाही त्यामुळे कर्मचारी यांच्यात थोडी नाराजी आहे असे शिक्षक समितीचे राज्य प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर यांनी व्यक्त केली. संचालनालय, लेखा व कोषागारे यांचेद्वारे प्रशासित करण्यात येत असलेल्या सर्व सगणक प्रणालींच्या संदर्भात मे. टाटा कम्युनिकेशन्स लिमिटेड यांचेकडील ञ्रींर चरपरसशव र्बीेळपस चे कामकाज महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ, मुंबई यांचेकडे हस्तांतरीत करण्याच्या कामकाजाच्या पार्श्वभूमीवर दि. ३१ ऑक्टोबर २०२४ रोजी देय ठरणारे माहे ऑक्टोबर, २०२४ चे वेतन आणि निवृत्तिवेतन दि.२५ ऑक्टोबर, २०२४ पूर्वी अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

यासाठी मुंबई वित्तीय नियम, १९५९ मधील नियम ७१ च्या तरतुदी आणि महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८ च्या खंड १ मधील नियम ३२८ आणि नियम ३२९ मधील तरतुदी शिथील करण्यात येत आहेत. माहे ऑक्टोबर, २०२४ च्या वेतनाचे आणि निवृत्तिवेतनाचे प्रदान दि.२५ ऑक्टोबर, २०२४ पूर्वी होण्यासाठी सर्व संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांनी वेतन देयके आणि निवृत्तिवेतन देयके त्वरीत यथास्थिती अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई; संबंधित जिल्हा कोषागार कार्यालय, उप कोषागार कार्यालय येथे सादर करावीत. सदर निर्णय जिल्हा परिषद, मान्यताप्राप्त व अनुदान प्राप्त शैक्षणिक संस्था, कृषि विद्यापीठे, अकृषि विद्यापीठे व त्यांच्या संलग्न अशासकीय महाविद्यालये यांचे अधिकारी / कर्मचारी, तसेच निवृत्तिवेतनधारक यांना देखील लागू होईल.

माहे ऑक्टोबर, २०२४ च्या वेतनाचे आणि निवृत्तिवेतनाचे प्रदान दि.२५ ऑक्टोबर, २०२४ पूर्वी होण्यासाठी संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई तसेच सर्व जिल्हा कोषागार कार्यालये व उप कोषागार कार्यालये यांना आवश्यक त्या सूचना तात्काळ निर्गमित कराव्यात.असे आदेश डॉ. राजेंद्र सुमन उत्तमराव गाडेकर शासनाचे उप सचिव यांनी दिले आहे.

# प्रबोधन गीत सरिता पुस्तकाचे प्रकाशन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५ गुरुकुंज मोझरी** – राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ५६ व्या पुण्यतिथीच्या निमित्ताने श्रीगुरुदेव आध्यात्म गुरुकुल येथे ग्रामगीता तत्त्वज्ञान आचार महायज्ञ व पालथी पदयात्रा शिबिर महोत्सव पार पडले.दरम्यान प्रबोधन गीत सरिता या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले आहे. सुप्रसिद्ध सप्तखंजर वादक राष्ट्रीय प्रबोधनकार इंजिनीयर भाऊसाहेब थुटे यांनी लिहिलेल्या गीतांचा संग्रह या पुस्तकामध्ये आहे. इंजिनीयर भाऊसाहेब थुटे हे गेल्या ३०-३५ वर्षापासून समाज प्रबोधनाचे कार्यक्रम करतात जवळजवळ दहा हजार समाज प्रबोधनाचे कार्यक्रम त्यांनी केलेले असून प्रबोधन क्षेत्रातील त्यांचा अनुभव दांडगा आहे त्यांच्या अनुभवातून प्रबोधनासाठी लागणारी गीत वेळोवेळी त्यांनी तयार केलेली होती. अनेक प्रबोधनकारांच्या आग्रहास्तव त्या सर्व गीतांना



एकत्रित करून प्रबोधन गीत सरिता हे पुस्तक आता वाचकांच्या सेवेत तयार आहे.या पुस्तकाच्या प्रकाशन प्रसंगी सुप्रसिद्ध व्यसनमुक्ती कीर्तनकार मधुकर महाराज खोडे, श्रीगुरुदेव आध्यात्म गुरुकुल चे संचालक रवी मानव, किसान पुत्र संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र जीवतोडे , सप्तखंजरी प्रबोधनकार आकाश आले इत्यादी मान्यवर उपस्थित होते.सदर पुस्तक हे प्रबोधनकारांसाठी अत्यंत उपयुक्त असल्याचे रवि मानव यांनी आपल्या मनोगत सांगितले.माझ्या प्रबोधनासाठी तयार केलेली गीत इतरांना आवडली आणि त्यांच्या आग्रहास्तव हे पुस्तक प्रकाशित होत असल्याचा आनंद इंजी.भाऊसाहेब थुटे यांनी व्यक्त केला.

# लुटमारीतील फरार आरोपीला गुजरातमधून अटक

## शिरजगाव कसबा पोलिसांची कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५ अमरावती**
शिरजगावकसबा पोलिस ठाण्याच्या हद्दीत वर्षभरापूर्वी लुटमारीचीघटना करून फरार असलेल्या आरोपीला शिरजगाव पोलिसांनी गुजरात राज्यातून मोठ्या शिताफीने अटक केली. छोटू ऊर्फ काला डिमर ऊर्फ संजू ऊर्फ संजय श्रीराम ऊईके (२२) रा. अवस्थी कॉप्लेक्स चे पाठीमागे संजय कॉलोनी विकासवार्ड बैतुलमध्यप्रदेश अटकेतील आरोपीचे नाव आहे. छोटू उर्फ कालाने सुमारे वर्षभरापूर्वी शिर जगाव पोलिस ठाण्याड्या हद्दीत लुटमारी केली होती. तेव्हापासून तो फरार होता. पोलिसांनी बैतुल परिसरात त्याचा स्थानिक पोलीसांचे मदतीने शोध घेण्यात आला होता परंतु नमुद आरोपी हा गुन्हा घडल्यापासून फरार झाला होता. त्याननंतर पोलिसांनी सोशल मिडीयावर



त्याचे फोटो व्हायरलकेले असता छोटू हा गुजरातमधील भरुच जिल्हयातील रोहीतगाव येथे कामाला असल्याची माहीती ठाणेदार एपीआय महेंद्र गवई यांना मिळाली. – त्यानुसार पीआय महेंद्र गवई यांनी शिरजगावकसबा पोलिस ठाण्याचे ठाणेदार महेंद्र गवई यांनी ठाण्यातील कॉस्टेबल अमोल कपले, मिलींद इंगोले सायबरसेल अमरावती येथील सागर धापड, पवन ढोके, चेतन गुल्हाने यांच्यासह तातडीने गुजरात राज्यातील भरूच तालुक्यात छोटू उर्फ कालाला अटक केली.

# यजमान अमरावती संघ पराभूत तर पुणे, नागपूर संघाची आगेकुच

## चार अंतिम संघात आज दि.२५ ला रंगणार साखळी स्पर्धा

### शिक्षणमहर्षी डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या शतकोत्तर रौप्य महोत्सवीपश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ महिला कबड्डी स्पर्धा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती**– शिक्षणमहर्षी पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या शतकोत्तर रौप्य महोत्सवी वर्षा निमित्त श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या मैदानावर सुरू असलेल्या पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ महिला कबड्डी स्पर्धेत यजमान संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ संघाला पराभवाचा सामना करावा लागला. या चुरशीच्या लढतीत पारुल विद्यापीठ वडोदरा या संघाने अमरावती विद्यापीठ संघाचा २३ विरुद्ध ३० असा सात गुणांनी पराभव केला.प्रेक्षकांच्या उदंड प्रतिसादात मैदानात उतरलेला अमरावतीचा संघ मध्यंतरापर्यंत १२ विरुद्ध ११ असा एका गुणांनी आघाडीवर होता. क्षणाक्षणाला या सामन्याचे पारडे एक दुसरीकडे झुकत होते. शेवटच्या दोन मिनिटापर्यंत अमरावती संघाने अल्पशी बढत मिळवली होती पण पारुल विद्यापीठाच्या खेळाडूंनी शेवटच्या काही मिनिटात उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत अमरावती संघाला सात गुणांनी पराभूत केले. आणि प्रेक्षक गॅलरीत एकच सन्नाटा पसरला. हातात आलेला सामना अमरावती संघ गमावून बसल्याने पुढील फेरीत या संघाला प्रवेश करता आला नाही. पारुल विद्यापीठ संघातर्फे



पलक आणि पनवर या खेळाडूंनी लाजवाब चढाई करत आपल्या संघाला विजयश्री मिळवून दिले. अमरावती संघातर्फे अक्षता धानोरकर, मंजुळा पवार आणि पायल श्रीनाथ यांची उत्कृष्ट खेळी संघाला विजय मिळवून देण्यात अपयशी ठरली.आजच्या सकाळच्या सत्रात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संघाने जे पी जे टी झुंनझुनू विद्यापीठ संघाचा ३३ विरुद्ध ३२ असा केवळ एक गुणांनी पराभव करत विजय प्राप्त केला. मध्यंतरापर्यंत दोन्ही संघ बारा बारा गुण घेत बरोबरीत होते. या सामान्याने कबड्डीचा थरार काय असतो याची प्रचिती प्रेक्षक वर्गांना आणून दिली. दोन्हीही संघ अत्यंत तुल्यबळ होते. पण पुणे विद्यापीठ संघाने शेवटपर्यंत शांत डोक्याने खेळल्याने आणि शेवटच्या मिनिटात चढाई करत तब्बल तीन खेळाडूंना बाद करत आपल्या संघाला विजय मिळवून दिला. पुणे विद्यापीठ संघातर्फे स्नेहा पावरा आणि कृष्णाई जाधव तर पारुल विद्यापीठातर्फे मुस्कान आणि तनु या खेळाडूंची खेळी सर्वोत्तम ठरली. आतापर्यंत झालेल्या सामन्यात हा सामना फारच अटीतटीचा झाला.त्यानंतर झालेल्या सामन्यात नागपूर विद्यापीठ संघाने महाराजा गंगासिंग विद्यापीठ बिकानेर या संघाचा ४१ विरुद्ध २२ असा १९ गुणांनी पराभव करत पुढील फेरीत प्रवेश केला. नागपूर संघातर्फे श्वेता रत्नपारखी आणि साक्षी त्रिवेदी यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. श्री बालाजी विद्यापीठ पुणे संघाने एकतर्फी सामन्यात राजस्थान विद्यापीठ जयपूर संघाचा ४३ विरुद्ध १८ असा २५ गुणांनी पराभव करत पुढील फेरीत प्रवेश केला. पुणे विद्यापीठ संघातर्फे ज्योती डफळे आणि शुभदा खोत यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले.आज सायंकाळच्या सत्रात श्री बालाजी विद्यापीठ पुणे विरुद्ध भारतीय विद्यापीठ पुणे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विरुद्ध कोटा विद्यापीठ कोटा, आर टी एम नागपूर विद्यापीठ विरुद्ध मुंबई विद्यापीठ मुंबई तर पारुल विद्यापीठ वडोदरा विरुद्ध एस आर टी एम विद्यापीठ नांदेड या संघात सामने रंगले. यातील विजयी चार चमूचे साखळी फेरीचे सामने उद्या सकाळच्या सत्रात होणार असून यातून पहिले चार संघ निवडण्यात येईल. या स्पर्धेला प्रेक्षकांचा उदंड असा प्रतिसाद लाभत असून स्पर्धा यशस्वीतेसाठी स्पर्धा संयोजक डॉ. सुभाष गावंडे यांच्या मार्गदर्शनात गठीत केलेल्या विविध समित्याचे सभासद परिश्रम घेत आहे.–

# राज्यस्तरीय शालेय नेटबॉल क्रीडा स्पर्धेचा समारोपराज्यस्तरासाठी संघाची निवड

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती** – राज्यस्तरीय शालेय नेटबॉल क्रीडा स्पर्धा विभागीय क्रीडा संकुलात दि. २२ ते २४ ऑक्टोबर २०२४ दरम्यान पार पडल्या. स्पर्धेचा समारोप व बक्षीस वितरण समारंभ माध्यमिक शिक्षणाधिकारी प्रिती देशमुख, महापालिकेचे शिक्षणाधिकारी श्री. मेश्राम, महाराष्ट्र अम्यॅच्युअर नेटबॉल असोशिएशनचे सहसचिव श्याम देशमुख, जिल्हा नेटबॉल असोशिएशनचे अध्यक्ष उदय ठाकरे, उपाध्यक्ष डॉ. सुगन बंड, जिल्हा क्रीडा अधिकारी गणेश जाधव उपस्थित होते.

१४ वर्षे मुले वयोगटामध्ये प्रथम स्थान अमरावती विभागाने प्राप्त केले. उपविजेते पद नाशिक, तर तृतीय स्थानावर छत्रपती संभाजीनगर विभाग यांनी संपादित केले. १४ वर्षे मुली वयोगटामधील प्रथम स्थान नागपूर विभागाने प्राप्त केले. उपविजेतेपद अमरावती, तर तृतीय स्थानावर छत्रपती संभाजीनगर विभागाने संपादित केले.

१९ वर्षे मुले वयोगटामध्ये विजेता प्रथम नागपूर विभागाला प्राप्त केले. उपविजेते पद अमरावती, तर तृतीय स्थान छत्रपती संभाजीनगर विभागाने संपादित केले. १९ वर्षे मुली वयोगटामध्ये विजेता प्रथम स्थान नागपूर विभागाने प्राप्त केले. उपविजेते पद अमरावती, तर तृतीय स्थानावर छत्रपती संभाजीनगर यांनी प्राप्त केले.

राज्याचा संघ निवडीसाठी क्रीडा विभागामार्फत १४ वर्षे मुले व मुली गटातील राज्यस्तर निवड चाचणी घेण्यात आली.



यात स्पर्धेतील ८ विभागातून आलेले निवड चाचणीचे खेळाडूंची निवड करून महाराष्ट्र राज्याच्या संघाची निवड करण्यात आली. निवड समिती सदस्य म्हणून श्याम देशमुख, सुशांत सुर्यवंशी, जगदीश आंचल यांनी कामकाज पाहिले.

# उच्च न्यायालयाच्या खंडपीठात विशेष लोकअदालतीचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती**– मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपिठ, नागपूर आणि औरंगाबाद खंडपिठ, औरंगाबाद येथे दि. ३० नोव्हेंबर आणि दि. १ डिसेंबर २०२४ रोजी विशेष लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. नागपूर आणि औरगाबाद विभागांतर्गत उच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या तडजोडपात्र प्रकरणांचा निपटारा या दिवशी करण्यात येणार आहे.

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणाने दिलेल्या निर्देशानुसार विशेष लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. यात प्रलंबित असलेले प्रकरणे तडजोडीने व सामंजस्याने निकाली काढण्याकरिता ठेवण्यात येणार आहेत. यासाठी कोणत्याही प्रकारच्या अतिरीक्त शुल्क भरावे लागणार नाही.





सर्व वकिल, नागरिक आणि पक्षकारांनी तडजोड प्राप्त प्रलंबित खटले विशेष लोकअदालती समक्ष तडजोड आणि सामंजस्याने मिटवण्याकरिता उच्च न्यायालय, नागपूर येथे प्रलंबित असलेल्या प्रकरणांमध्ये अर्ज करावा, तसेच आधिक माहितीसाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अमरावती यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश सुधाकर वे. यार्लगड्डा, तसेच सचिव मंगला कांबळे यांनी केले आहे.–

# अद्विक उज्वल बारंगेची राज्यस्तरीय रोलर स्केटिंग स्पर्धेकरिता निवड

## आमदार, खासदार चषकातही केली चमकदार कामगिरी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती**– येथील नारायणा विद्यालयमचा तिसऱ्या वर्गाचा विद्यार्थी अद्विक उज्वल बारंगे याने नुकत्याच झालेल्या डिस्ट्रिक चॅम्पियनशिप रोलर स्केटिंग स्पर्धेत सात ते नऊ वर्षे वयोगटात रौप्यपदक पटकावले असून त्यातून आता त्याची राज्यस्तरीय स्पर्धेकरिता निवड झालेली आहे. ही राज्यस्तरीय स्पर्धा पुढील महिन्यात विरार (मुंबई) येथे होणार आहे.अद्विक हा शहरातील प्रख्यात शल्यतज्ञ डॉ. उज्वल तसेच डॉ. वैशाली बारंगे याचा मुलगा आहे. यापूर्वी अद्विकने आमदार आणि खासदार चषक-२०२४ च्या स्केटिंग स्पर्धेत सहभाग घेतला असून २०२४ मध्ये आयोजित खुल्या जिल्हा रोलर स्केटिंग स्पर्धेत कांस्यपदक, नागपूर येथे आयोजित ओपन रोलर स्केटिंग राष्ट्रीय स्पर्धेत कांस्यपदक, प्रमुख ध्यानचंद रोलर स्केटिंग स्पर्धेत रौप्यपदक आणि पुण्यात झालेल्या २२ व्या एलएक्सटी इंटरक्लब शर्यतीत कांस्यपदक पटकावले आहे. तो आपल्या यशाचे श्रेय प्रसाद रोलर स्केटिंग क्लबचे सर्वेसर्वा प्रसाद जोशी, मिलिंद



सराफ यांच्यासह क्लबचे सर्व सदस्य, नारायणा विद्यालयाचे प्राचार्य राहुल भेलकर आणि क्रीडाशिक्षक क्षितीज सर यांना देतो.

# चांदूर रेल्वे शहरात प्रियंका निलेश विश्वकर्मा यांचा झंजावत



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५ चांदुर रेल्वे**

घरो घरी जाऊन मतदाराच्या भेटी, महिलाचा उत्कृष प्रतिसाद चांदूर रेल्वे शहरात वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार निलेश विश्वकर्मा यांच्या आधार्गिनी सौ. प्रियंका विश्वकर्मा यांनी प्रचार रॅली काढून घरोघरी जाऊन मतदाराच्या भेटी घेतल्या महिला मतदारांनी रॅली ला प्रचंड प्रतिसाद दिला.

सौ. प्रियंका निलेश विश्वकर्मा यांनी चांदूर रेल्वे शहरातील शिक्षक कॉलोनी, बँक कॉलोनी, जिजामाता कॉलोनी, ढोले कॉलोनी, मेटे कॉलोनी, साईनाथ कॉलोनी, इंदिरा नगर, संताबाई यादव नगर, खडकपुरा, डांगरी पुरा, शेंद्रीपुरा इत्यादी कॉलोनीतील घरो घरी मतदारांच्या भेटी घेतल्या या पायदळ रॅली मध्ये डॉ. निलेश विश्वकर्मा यांना महिलांनी या निवडणुकीत निवडून आणण्याचे आश्वासन या वेळी रॅली मधी शहरातील असंख्य महिला उपस्थित होत्या निलेश विश्वकर्मा यांच्या कामाचा नागरिकांनी पाढा वाचून दाखवला कोरोना काळात केलेले काम आम्ही विसरू शकत नाही असेही महिला मतदारांनी म्हटले. गावो गावी सौ. प्रियंका विश्वकर्मा यांच्या रॅली ला महिलांचा तसेच पुरुष मतदारांचा व युवा मतदारांचा मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे या वेळी रॅली मध्ये प्राजक्ता पिल्लेवान (वंचित युवा आघाडी जिल्हा अध्यक्ष), मनीषा बामबोडे, रीना गजभिये, अस्मिता बागडे, बेबी ताई लांडगे, उषा मेश्राम, सुलोचना गोत्रे, संगीता नागोसे, पुष्पा शेळके, गुड्डी गोंडाणे, सुशीला पानेकर, परवाना पठाण, पुष्पा मगर, मंगला पवार, लता खोडपे, दिपाली शेंडे, उज्वला शिंदे, ज्योती यादव, सुनंदा शिंदे, वनश्री नेवारे, संगीता राऊत, वंदना राऊत, अरुणा राऊत, चित्रा राऊत, यांच्या सह असंख्य महिला उपस्थित होते.

# महानगरपालिकेत आढावा; राज्य लोकसेवा हक्क आयोगाचे आयुक्त डॉ.नरुकुल्ला महापालिकेने 'टाईम लिमिट'मध्ये नागरिकांची कामे करावी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५ अमरावती**

आजच्या घडीला प्रत्येक कामे ही ऑनलाइनद्वारे होत आहेत. झोमॅटो ही पाच मिनिटात घरपोच डिलिव्हरी देत असेल तर शासकीय सेवक म्हणून नागरिकांची कामे तत्क्षणी झाली पाहिजे, त्याकरिता सात दिवसांचा अवधी कशाला? असे म्हणत लोकांची कामे 'टाईम लिमिट'मध्ये करा, असे निर्देश राज्य लोकसेवा हक्क आयोगाचे आयुक्त डॉ. नरुकुल्ला रामबाबू यांनी येथे दिले.



अमरावती महानगरपालिका स्तरावर महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ च्या प्रभावीपणे अंमलबजावणीची गुरुवारी आढावाबैठक पार पडली. यावेळी अधिकारी, कर्मचाऱ्यांना त्यांच्या कर्तव्याची जाणीव त्यांनी करून दिली. डॉ. नरुकुल्ला रामबाबू पुढे म्हणाले, लोकसेवा हक्क कायद्यातील सेवा आढावा घेताना डॉ. नरूकुल्ला रामबाबू, आयुक्त सचिन कलंत्रे व अधिकारी नागरिकांना वेळेत द्यावी या अधिनियमान्वये शहरातील नागरिकांना पारदर्शक गतिमान व कालबद्ध सेवा मिळण्याचा अधिकार प्राप्त झाला असून, या कायद्याची सर्व विभागांनी प्रभावीपणे अंमलबजावणी करावी.

प्रत्येक कार्यालयात सेवा हमी कायद्याच्या अधिसूचित सेवांची सूची दर्शनी भागावर प्रदर्शित करावी, त्यात पदनिर्देशित अधिकारी, प्रथम अपील अधिकारी, अपील अधिकारी यांचे नाव निर्देशित केलेले असावे, अशा त्यांनी सूचना केल्या. महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक सचिन कलंत्रे यांनी राज्य लोकसेवा हक्क आयोगाचे आयुक्त डॉ. नरुकुल्ला रामबाबू यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

यावेळी अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्तद्वय डॉ. मेघना वासनकर, नरेंद्र वानखडे व योगेश पिठे, कक्ष अधिकारी देवेंद्र चव्हाण, मुख्यलेखापरीक्षक श्यामसुंदर देव, मुख्यलेखापाल दत्तात्रय फिस्के, एडीटीपी घनश्याम वाघाडे, शहर अभियंता ईश्वरानंद पनपालिया, सहायक आयुक्त भूषण पुसतकर, नंदकिशोर तिखिले, दीप्ती गायकवाड, धनंजय शिंदे, सुभाष जानोरे, एमओएच डॉ. विशाल काळे, डॉ. अजय जाधव, सिस्टम मॅनेजर अमित डेंगरे, इओ प्रकाश मेश्राम, कार्यकारी अभियंता रवींद्र पवार, अधीक्षक नंदकिशोर पवार, उद्यान अधीक्षक श्रीकांत गिरी, दीपक खडेकार, मंगेश जाधव, उदय चव्हाण, योगेश कोल्हे, लक्ष्मण पावडे, डॉ. स्वाती कोवे, श्यामकांत टोपरे, प्रमोद इंगोले, आशिष अवसरे, आदी उपस्थित होते.

# विधानसभा निवडणुकीचे काम नको!

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती**

आगामी विधानसभा निवडणुकीत उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी उमेदवारांची लगबग सुरू असताना निवडणुकांची कामे रद्द करण्यासाठी कर्मचारी जिल्हा मुख्यालयाच्या फेऱ्या मारत आहेत. परंतु, नियुक्ती रद्दबाबत निवडणूक आयोगाचे स्पष्ट धोरण असल्याचे सांगत अधिकाऱ्यांकडून अर्ज नाकारण्यात येत आहेत.

जिल्ह्यात विधानसभेच्या आठ मतदारसंघांत रणधुमाळीला प्रारंभ झाला आहे. या सर्व ठिकाणी २० नोव्हेंबरला मतदान, तर २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणीची प्रक्रिया पार पडणार आहे. निवडणुकांच्या कामांसाठी



जिल्ह्यात साधारणतः १२ हजार अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आली आहे. त्यामध्ये महसूल, महापालिका, जिल्हा परिषद यासह शासनाच्या विविध विभागांकडील कर्मचारी नियुक्त केले आहेत. याशिवाय शिक्षकांनाही निवडणुकांची कामे देण्यात आली आहेत. निवडणुकीसाठी नेमणूक केलेले काही कर्मचारी दररोज जिल्हा निवडणूक शाखेत येत आहेत. यावेळी संबंधित कर्मचाऱ्यांकडून निवडणुकीच्या कामातून सुटका करून घेण्यासाठी विविध कारणे पुढे केली जात आहेत. त्यामध्ये दिवाळीसुट्यांसाठी कुटुंबातील व्यक्तिगत अडचणींचे कारण हमखास पुढे कैले जात आहे. याशिवाय ड्यूटी रद्द करण्यासाठी वैयक्तिक व कुटुंबातील व्यक्तींचे आजारपण तसेच अन्य कारणेही दिली जात आहेत.

मात्र, निवडणूक शाखेच्या अधिकाऱ्यांकडून कर्मचाऱ्यांचे अर्ज तपासण्यात येत आहेत. त्यामध्ये आयोगाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करताना परिस्थिती पाहूनच नियुक्ती रद्दबाबतचा निर्णय घेण्यात येत आहे. त्यामुळे अपवाद वगळता अन्य कर्मचाऱ्यांना आल्या पावली परत जाण्याची वेळ येत आहे.

# मतदानासाठी कर्मचाऱ्यांना सुट्टी देण्याचे निर्देश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती**


विधानसभा निवडणुकीचे मतदान दि. २० नोव्हेंबर रोजी होणार आहे. मतदारांना मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी यादिवशी विविध आस्थापनांनी आपल्या कर्मचा-यांना सवेतन सुट्टी द्यावी, असे आदेश देण्यात आले आहेत.

भारत निवडणूक आयोगाच्या सुचनेनुसार उद्योग विभागाने याबाबत परिपत्रक जारी केले आहे. विधानसभा निवडणुकीत मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी राज्य शासनाने अधिसूचनेद्वारे दिनांक २० नोव्हेंबर २०२४ या मतदानाच्या दिवशी सर्व विधानसभा मतदारसंघातील मतदान करण्याचा अधिकार असलेल्या प्रत्येक व्यक्तीला सुट्टी दिली जाईल. उद्योग विभागात येणा-या सर्व उद्योग समूह, महामंडळे, मंडळे, कंपन्या व संस्था, औद्योगिक उपक्रम आदींनाही ही सुट्टी लागू राहील. या सुट्टीच्या कारणास्तव व्यक्तीचे वेतनात कपात केली जाणार नाही.

अपवादात्मक परिस्थितीत कामगार, अधिकारी, कर्मचारी यांना पूर्ण दिवसाची सुट्टी देणे शक्य नसेल तर कमीत कमी दोन तासांची सवलत द्यावी मात्र, त्याबाबत जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिका-यांची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे.मतदानासाठी सुट्टी अथवा सवलत न मिळाल्याने मतदान करता येणे शक्य झाले नाही अशी तक्रार मतदाराकडून झाल्यास आस्थापनांवर कारवाई करण्यात येईल, असाही इशारा देण्यात आला आहे.

# गोकुलम गौरक्षण संस्थेत बैलाच्या शिंगावर यशस्वी शस्त्रक्रिया

## सात दिवसात शिंगाच्या कर्करोगातून केली सुटका



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती**

गोकुलम गौरक्षण संस्थेतील पशुचिकित्सालयात शिरसगाव बंड येथून डॉ. कांडलकर यांच्या सात वर्षे वयाच्या बैलाला मागील एक वर्षापासून शिंगाच्या कर्करोग जडला होता. पशुपालकाकडून विचारणा केली असता त्यांनी सांगितले की मागील एक वर्षापासून बैलाला स्थानिक पशुवैद्यकाकडे औषधोपचार देण्यात आले होते परंतु आजार दुरुस्त झाला नाही म्हणून गोकुलम गौरक्षण संस्थेत धाव घेण्यात आली. संस्थेत आणताच बैलाची तपासणी पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांकडून तात्काळ करण्यात आली. बैलाच्या शिंगाचा कर्करोग मोठ्या प्रमाणात वाढल्याने काही विलंब न करता तात्काळ शस्त्रक्रिया करण्याचे नियोजन केले गेले. पशूची सर्व काळजी घेत उत्तमरीत्या शस्त्रक्रिया करण्यात आली. ही शस्त्रक्रिया झाल्यानंतर पाच दिवस मोठ्या बारकाईने बैलाची सुश्रुषा करण्यात आली त्यानंतर सात दिवसाने शस्त्रक्रियेचे टाके काढण्यात आले. त्यानंतर पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी पुन्हा तपासणी आजार पूर्ण बरा झाल्याचे लक्षात येताचं बैलाला पशुपालकाकडे सोपवण्यात आले. यावेळी पशुपालक डॉ. कांडलकर यांनी पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांसह संस्थेचे आभार मानले.

# मोर्शी मतदारसंघात ट्विस्ट भाजपच्या वाट्याला आमदार भुयारांनी गाठले 'सिल्व्हर ओक'! पण साहेबांची भेटच नाही : उमेश यावलकर भाजपाचे उमेदवार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४ वरुड**

मोर्शी विधानसभा मतदारसंघात ठाकरे देशमुख गटाचं राजकारणात खासदार डॉ. बोंडेंनी उडी घेतल्याने गटातटाचे राजकारण सुरू झाले आहे. माळी समाजाला खुश करण्यासाठी भाजपमध्ये गेल्या पाच वर्षांपासून उमेदवारीच्या लालसेपोटी समाजातील तीन नेते इच्छुक आहेत. मात्र ऐनवेळी ही जागा महायुतीमध्ये अजित पवार गटाला सुटल्याने विद्यमान आमदार देवेंद्र भुयार यांना उमेदवारी निश्चित झाली होती. परंतु दोन दिवसांपूर्वी त्यातही ट्रीस्ट आला राष्ट्रवादीऐवजी मोर्शी भाजपच्या वाट्याला येणार असल्याचे संकेत मिळाले. तिकडे अजित पवार गटाने जर नाकारले तर पुन्हा थोरल्या पवार साहेबांना उमेदवारीसाठी साकडे घालण्याच्या हालचाली देवेंद्र भुयारांकडून सुरू झाल्याची



चर्चा आहे.मात्र आज उमेश यावलकर भाजपाचे उमेदवार म्हणून जवळपास नक्की जले असल्याची माहिती आहे.

सप्टेंबर महिन्यात वरूडात पार पडलेल्या जनसन्मान यात्रेदरम्यान उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विद्यमान आमदारांवर कौतुकाचा वर्षाव केला होता. त्यांच्या उमेदवारीची घोषणाही केली होती. मात्र त्यानंतर वादग्रस्त विधानामुळे आमदार भुयार कमालीचे अडचणीत सापडल्याची चर्चा आहे. त्यामुळे महायुतीत अजित पवार गटाकडे जाणारी मोर्शीची जागा भाजपच्या वाट्याला येण्याचे संकेतमिळत आहेत. लागलीच त्यांनी 'तुतारी' घेण्याचा निर्णय घेतला. पण ज्यांना सोडून अजित पवार गटाशी घरठाव केला, त्या पक्षात त्यांना प्रवेश मिळेल काय, असा प्रश्न उपस्थित झाला आहे. तिकडे शरद पवार गटाचे नेते माजी मंत्री हर्षवर्धन देशमुख आमदार भुयारांवर जाम नाराज आहेत. असे असले तरी भुयार यांनी 'सिल्व्हर ओक' गाठले, साहेबांची भेट मात्र होऊ शकली नाही, अशी माहिती त्यांचेच कार्यकर्ते खासगीत देताहेत. याबाबत आमदार भुयार यांच्याशी संपर्क केला असता होऊ शकला नाही. स्थानिक भाजपचाही त्यांना विरोध असल्याने आमदारांच्या अडचणीत मोठी वाढ झाली आहे.हा मतदार संघ भाजपाला गेला तर देवेंद्र भुयार यांना अपक्ष निवडणूक लढल्या शिवाय पर्याय उरणार नसल्याच बोलल्या जात आहे.

# दाणा चक्रीवादळामुळे रेल्वेचीही दाणादाण एकूण ५५२ रेल्वे गाड्या रद्द

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५ नागपूर**

बंगालच्या खाडीत उठलेल्या 'दाना' चक्रीवादळाने ओडिशा, पश्चिम बंगालमध्ये दाणादाण उडवली आहे. त्याची झळ विविध प्रांतातील प्रवाशांनाही



बसली आहे. कारण देशभरातील विविध मार्गावर धावणाऱ्या एकूण ५५२ रेल्वे गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत.

१२० किलोमिटर पेक्षा जास्त प्रति तास वेग असलेल्या दानाचा केवळ ओडिशा आणि पश्चिम बंगालच नव्हे तर विविध प्रांतावर प्रतिकुल परिणाम होणार आहे. कारण या चक्रीवादळाच्या भीतीमुळे साउथ ईस्ट रेल्वेने १५०, ईस्ट कोस्ट रेल्वेने १९८, ईस्टर्न रेल्वेने १९० तर साउथ ईस्ट सेंट्रल रेल्वेने १४ गाड्या रद्द केल्या आहेत. विशेष म्हणजे, ओडिशा आणि पश्चिम बंगालमध्ये नागपूर मार्गे रोज जाणाऱ्या आणि येणाऱ्या रेल्वे गाड्यांची संख्या मोठी आहे. अशात एकूण ५५२ गाड्या रद्द करण्यात आल्यामुळे सर्वच मार्गावरील आणि बहुतांश प्रदेशातील प्रवाशांना त्याची झळ पोहचली आहे. नागपूर मार्गे हावडा, जगन्नाथ पुरी कडे धावणाऱ्या अनेक गाड्या उशिरा धावत असल्याचे सूत्रांनी सांगितले आहे.

# भाजप नेत्यांनी दिले मला उमेदवारीचे आश्वासन : तुषार देशमुख

## नवाथे मार्गावर प्रचार कार्यालयाचे भुमीपूजन : नामांकन अर्जाचीही केली उचल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५ अमरावती**

बडनेरा मतदारसंघातून उमेदवारी मलाच देण्यात येईल असे आश्वासन प्रदेशाध्यक्ष बावनकुळे, उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी आपल्याला दिले असल्याचा दावा भाजपा नेते तुषार भारतीय यांनी केला. नवाथे मार्गावरील आपल्या प्रचार कार्यालयाच्या भुमीपूजनप्रसंगी ते बोलत होते. बडनेरा मतदारसंघातील



कचरा साफ करण्यासाठी आपली उमेदवारी असल्याचेही ते म्हणाले.

भाजपा नेते तुषार भारतीय यांनी नवाथे मार्गावर आपल्या प्रचार कार्यालयाचे भुमीपूजन केले. युवा स्वाभिमान पार्टीचे नेते, आ रवि राणा यांना त्यांनी आव्हान दिले आहे. भाजपाने अद्याप बडनेरा मतदारसंघातून उमेदवाराचे नाव बो जाहीर केले नसले तरी, तुषार भारतीय यांच्या र दाव्यामुळे येथील राजकारण तापले आहे. – दरम्यान, गुरूवारी प्रचार कार्यालयाचे भुमीपूजन करताना, तुषार भारतीय म्हणाले की, बडनेरा मतदारसंघात पडलेला कचरा साफ करण्यासाठी माझी उमेदवारी आहे.

मागील काही वर्षापासून बडनेरा मतदारसंघ विकासापासून प्रचंड मागे आहे. येथील सावकार आमदाराच्या कार्यकाळात परिसराचा विकास झाला नाही. ही लढाई विचारांची आहे. यामध्ये आपल्याला विद्यमान आमदाराला पराभूत करायचे आहे.पक्षाच्यावतीने प्रदेशाध्यक्ष बावनकुळे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मला आश्वस्त केले आहे की, येथील उमेदवार मीच राहणार आहे. दरम्यान, आपल्या नामांकन अर्जाची उचलही तुषार भारतीय यांनी आज, गुरुवारी केली. यामुळे निवडणूक लढण्याचा आपला निर्णय खंबीर असल्याचा संदेशच त्यांनी दिला आहे.

# पुन्हा काँग्रेसचे तेच चार दिग्गज उतरले निडणुकीच्या मैदानात : पारंपरिक विरोधकांशीच होणार सामना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५ अमरावती**

माजी मंत्री यशोमती ठाकूर, माजी राज्यमंत्री डॉ. सुनील देशमुख, माजी आमदार वीरेंद्र जगताप आणि काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख या जुन्याच चेहऱ्यांना काँग्रेसने संधी दिली आहे. प्रा. वीरेंद्र जगताप यांना सातव्यांदा, यशोमती ठाकूर यांना पाचव्यांदा, तर बबलू देशमुख यांना तिसऱ्यांदा उमेदवारी देण्यात आली आहे. डॉ. सुनील देशमुख हे तीन वर्षांपुर्वी स्वगृही परतले. त्यांना पंधरा वर्षाच्या प्रतीक्षेनंतर चौथ्यांदा काँग्रेसची उमेदवारी मिळाली आहे. चौघांचा सामना परंपरागत विरोधकांशीच होणार आहे.



यशोमती ठाकूर यांनी सर्वप्रथम २००४ मध्ये निवडणूक लढवली होती. त्यावेळी त्यांचा पराजय झाला होता, पण त्यानंतर २००९, २०१४ आणि २०१९ अशी हॅटट्रिक करून त्या गेल्या पंधरा वर्षांपासून त्या आमदार आहेत. महाविकास आघाडी सरकारच्या काळात अडीच वर्षे त्या महिला व बालविकास विभागाच्या मंत्री म्हणून कार्य केले आहे. त्यांच्या विरोधात महायुतीकडून कुणाला उमेदवारी मिळणार, याची उत्सुकता आहे.

धामणगावमधून प्रा. वीरेंद्र जगताप यांना तब्बल सातव्यांदा रिंगणात राहणार आहेत. १९९५ आणि १९९९ मध्ये यांना पराभव पत्करावा लागला होता. त्यानंतर २००४, २००९ आणि २०१४ मध्ये ते सलग तीन वेळा निवडून आले. पण, २०१९ मध्ये त्यांचा पुन्हा पराभव झाला. पराभवानंतरही गेल्या पाच वर्षांत त्यांनी मतदारसंघात जनसंपर्क कायम ठेवला आहे. त्यांची लढत भाजपचे प्रताप अडसड यांच्याशी पुन्हा एकदा होणार आहे. वंचित बहुजन आघाडीचे नीलेश विश्वकर्मा यावेळीही सज्ज आहेत.

अचलपूरमधून काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांना तिसऱ्यांदा संधी देण्यात आली आहे. त्यांना उमेदवारी देऊन काँग्रेसने जातीय समीकरणांचा विचार केला आहे. २०१४ आणि २०१९ च्या निवडणुकीत बबलू देशमुख यांचा प्रहार जनशक्ती पक्षाचे बच्चू कडू यांनी पराभव केला होता. यावेळी प्रहारचे बच्चू कडू, भाजपचे प्रवीण तायडे आणि काँग्रेसचे बबलू देशमुख अशी तिरंगी लढत राहणार आहे.

अमरावतीतून १५ वर्षांनंतर डॉ. सुनील देशमुख यांना काँग्रेसची उमेदवारी मिळाली आहे. गेल्या वेळी ते भाजपकडून रिंगणात होते. काँग्रेसच्या उमेदवार सुलभा खोडके यांनी त्यांचा पराभव केला होता. आता बदललेल्या राजकीय परिस्थितीत राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाच्या सुलभा खोडके यांच्याशी त्यांचा सामना होणार आहे. जगदीश गुप्ता हे महायुतीत बंड करण्याची शक्यता असल्याने ही लढत रंजकदार होणार आहे.

# नियमात राहूनच करावी लागणार तयारी निवडणूक विभागाने निश्चित केले वाहनांचे दर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती**

उमेदवारांना मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी प्रचार करणे आवश्यक आहे. प्रचारासाठी प्रामुख्याने विविध प्रकारच्या वाहनांचा उपयोग केला जातो. कोणत्या वाहनाचे दर दिवसाला किती रुपये भाडे राहील, हे निवडणूक विभागाने निश्चित केले आहे. त्यानुसार टाटा सुमो, बोलेरो, काळी-पिवळी, जीप यांचे इंधनासह प्रति दिवसाचे भाडे ३ हजार ८०० रुपये, तर बैलगाडी, घोडगाडी प्रतितास २ रुपये दर ठरविण्यात आले आहे. त्यामुळे निवडणूक विभाग याकडे लक्ष ठेवणार असून त्यानुसार उमेदवारांचा खर्च निश्चित केला जाणार आहे.

निवडणुकीदरम्यान मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी उमेदवाराला प्रचार करावा लागतो, यासाठी वाहने भाड्याने घेऊन त्यावर ध्वनिक्षेपक लावला आतो. तसेच बॅनर, पोस्टर व वाहनाला बॅनर, पोस्टर बांधून उमेदवार प्रचार करतात. निवडणुकीदरम्यान खर्चाची मर्यादा पाळणे उमेदवाराला आवश्यक आहे. यावर्षीच्या विधानसभा निवडणुकीत ४० लाख रुपयांची मर्यादा देण्यात आली आहे. दर दिवशीचा खर्च उमेदवाराला निवडणूक विभागाकडे सादर करावा लागतो. खर्चाची मर्यादा ओलांडल्यासनिवडून येऊनही उमेदवारांचे पद धोक्याचे देण्याची शक्यता अधिक आहे. निवडणूक खर्चाचा हिशोब जुळवताना कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी निवडणूक विभागाने जवळपास सर्वच प्रकारच्या वाहनांचे दर ठरवले आहेत. सोबतच इंधनासह व इंधनाशिवाय असेसुद्धा वर्गीकरण केले आहे. त्यानुसार निवडणूक खर्च विभागाला सादर करणे आवश्यक आहे.

## जीपचे भाडे चार हजार रुपये



## ऑटोरिक्षा एक हजार रुपये दिवस

ऑटोरिक्षाच्या माध्यमातूनही प्रचार केला जातो. निवडणूक विभागाने इंधनासह ऑटोरिक्षाचा दर प्रतिदिवस एक हजार रुपये, सायकल रिक्षा प्रतितासं २ रुपये, दुचाकी प्रतितास २० रुपये, ट्रॉलीसोबत ट्रॅक्टर प्रतिदिवस ३ हजार रुपये दर ठरविला आहे

## मालवाहू वाहनासाठी पाच हजार रुपये

मालवाहू हलक्या वाहनाचे इंधनासह भाडे ५ हजार २६० रुपये ठरविण्यात आले आहे. १० चाकी वाहन असल्यास १२ हजार ८०० रुपये, १२ ते १४ चाकी वाहन १३ हजार ६०० रुपये, १६ चाकी वाहनाचे भाडे २५ हजार ७०० रुपये ठरविले आहेत. त्यानुसार निवडणूक खर्च सादर करावा लागेल. कितीही रुपये दिले तरी निवडणूक विभागाकडे खर्च सादर करतेवेळी निवडणूक विभागाने ठरवून दिलेल्या दरानेच खर्च सादर करायचा असतो.

४० सीटर प्रवासी वाहनाचे भाडे दिवसाला ७ हजार ७०० रुपये, तर इंधनासह १० हजार ४०० रुपये ठरविण्यात आले आहे. १८ सीटर वाहनासाठी दिवसाचे इंधनाशिवाय भाडे ४ हजार ६२५ रुपये, तर इंध-नासोबत भाडे ५ हजार ७६० रुपये ठरविले आहे. ५० लिटर वाहनाचे इंधनासो- बतचे भाडे २२ हजार ९५० रुपये ठरविण्यात आले आहे.

# अचलपूर विधानसभा मतदारसंघात भाजपचे प्रविण तायडे यांनी दाखल केला उमेदवारी अर्ज



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अचलपूर**

अमरावती जिल्ह्यातील अचलपूर विधानसभा मतदार संघात महायुतीचे (भाजप) प्रविण तायडे यांनी आज अचलपूर उपविभागीय अधिकारी कार्यालयात आपला नामकन अर्ज दाखल केला. उपविभागीय अधिकारी कार्यालयात नामांकन अर्ज दाखल करण्यापूर्वी भाजपचे उमेदवार प्रविण तायडे यांनी अचलपूर शहरात रॅली काढून जोरदार शक्ती प्रदर्शन केले.

या शक्ती प्रदर्शनाला भाजपच्या माजी खासदार नवनीत राणा प्रामुख्याने उपस्थित होत्या. ,या रॅलीत शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते. अचलपूर विधानसभा मतदारसंघात महायुतीचे (भाजप) उमेदवार प्रविण तायडे यांना प्रहार जनशक्ती पक्षाचे प्रमुख आ. बच्चू कडू व महाविकास आघाडीचे बबलू देशमुख यांचे तगडे आव्हान असणार आहे. जे ही बोलणारे लोक आहेत त्यांना सेटिंग करणारे लोक हवे होते. मात्र आमचा उमेदवार हा सेटिंग करणारा नाही. आमचा उमेदवार चटणी भाकर खावून जीवाचे रान करणारा आहे असे नवनीत राणा म्हणाल्या.

# सणासुदीच्या काळात जादा तिकीट आकारणीवर आरटीओंचा असणार वॉच

## खासगी ट्रॅव्हल्सधारकांकरवी लूट : पथक करणार तपासणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती**

सणासुदीत विशेषतः दिवाळीत प्रवाशांची संख्या वाढत असते. अशा स्थितीत खासगी ट्रॅव्हल्सधारक तिकीटाची किंमत वाढवितात. मात्र, जादा तिकीट आकारणीवर प्रादेशिक परिवहन विभागाच्या पथकाची करडी नजर राहणार आहे. जादा तिकीट आकारल्यास ट्रॅव्हल्स संचालकांवर कारवाई करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

अमरावती मधून पुणे, औरंगाबाद, मुंबई,नाशिक,इंदोर यासह विविध शहरांत नोकरी, शिक्षणाच्या निमित्ताने अनेकजण स्थायिक झाले आहेत तसेच अमरावती मध्ये सुद्धा परराज्यांतील व इतर शहरांतील नागरिक नोकरीच्या निमित्ताने स्थायिक झाले आहेत.बाहेरगावी असणारे सर्वच जण दिवाळीच्या सुट्यांमध्ये स्वगृही जाण्यास प्राधान्य देतात. त्यामुळे रेल्वे आणि एसटी आरक्षण फुल्ल असल्यामुळे नागरिक ट्रॅव्हल्स बसने प्रवास करतात.

खासगी प्रवासी बसला एस.टी. महामंडळाच्या प्रवासी तिकीट दराच्या दीडपट भाडे आकारता येते. त्यापेक्षा जादा भाडेदर आकारण्यास बंदी घालण्यात आली आहे. परंतु, अनेक ट्रॅव्हल्स संचालक अधिक नफा कमविण्याच्या अनुषंगाने अधिक दर आकारतात. मात्र, असे करणाऱ्यांवर आरटीओंच्या पथकांची नजर राहणार आहे. विशेषतः राष्ट्रीय महामार्गावर प्रादेशिक परिवहन विभागाचे पथक तैनात करण्यात आले आहे. तेथूनही वॉच ठेवला जाणार आहे.




### प्रवाशांची होतेय लूटमार

अमरावती शहरातील मूळ रहिवासी दिवाळी सुटीनिमित्त परत येतात. यासाठी ते वाटेल ते प्रवासभाडे देत असतात. त्याचाच फायदा खासगी ट्रॅव्हल्सवाले घेत आहेत. प्रवाशांकडून नियमांपेक्षा जादा दराने आकारणी केली जाते. त्यामुळे शहर परिसरातील नागरिकांची मोठ्या प्रमाणात लूट होत आहे. सदर प्रकार थांबविण्यासाठी अमरावती प्रादेशिक परिवहन विभाग सज्ज झाला आहे. त्यांच्याकडून ट्रॅव्हल्सचालकांवर करडी नजर ठेवण्यात आली आहे.

# ग्रामीण भागात विविधरंगी रांगोळ्यांनी सजली बाजारपेठ : रंगीत रांगोळ्यांनी पसंती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५ अचलपूर**

दिवाळीचा सण रांगोळीशिवाय अपूर्ण आहे. दिवाळीत घरासमोर आकर्षक रांगोळ्या पाहायला मिळत असून, प्रत्येकाचे अंगण रांगोळीने सजविले जाते. लक्ष्मीच्या स्वागतासाठी दारासमोर रांगोळी काढण्याची परंपरा पुरातन काळापासून वर्षानुवर्षे सुरू आहे. दिवाळी सणानिमित्त शहरासह ग्रामीण भागातही ठिकठिकाणी बाजारपेठा सप्तरंगी रांगोळ्यांनी सजल्या आहेत. दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर बाजारपेठेत चांगलाच उत्साह दिसून येत आहे. लाखनी तालुक्यातील अचलपूर,मोर्शी,वरुड येथील बाजारपेठेत रंगीबेरंगी रांगोळ्यांनी दुकाने सजली आहेत. आता सर्वत्र रंगीत रांगोळी उपलब्ध झाल्याने रांगोळीचे रंग तयार करण्याचा त्रास कमी झाला आहे. त्यामुळे महिला वर्गाचा रंगीत रांगोळी खरेदी करण्याकडे कल वाढत आहे. पांढरी रांगोळी बाजारात वर्षभर उपलब्धअसते. आता बाजारपेठेत तयार - आकर्षक रंगीत रांगोळी मिळत आहे. निळा, हिरवा, लाल, गुलाबी, पिवळा - अशा रांगोळीच्या असंख्य विविध छटा - विक्रीसाठी उपलब्ध आहेत. तरुणी वमहिलावर्ग बाजारपेठेतील रंगीबेरंगी रांगोळ्यांनी सजलेली दुकाने गाठून आपल्या आवडीच्या विविधरंगी रांगोळ्या खरेदी करीत असल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे.



**रांगोळी काढण्याच्या पद्धतीतही बदल**

कालानुरूप रांगोळी काढण्याच्या पद्धतीही बदलल्या आहेत. पूर्वी तांदळाचे बारीक पीठ, खड्ग, हळद आणि कुंकू यापासून देखील रंगीत रांगोळी तयार केली जात होती. मात्र, अलीकडे बाजारपेठेत अनेक प्रकारचे आधुनिक फ्रेम्स उपलब्ध आहेत. त्यांच्या माध्यमातून गृहिणी अधिक आकर्षक रांगोळी काढू शकतात. स्टिकरची रांगोळी ही रेडिमेड प्रिंटेड असून, या स्टिकरमुळे वेळ वाचतो. सध्या लक्ष्मीच्या पावलांचे स्टिकर्स, ओम-स्वस्तिकचे स्टिकर्स, तोरण रांगोळीचे स्टिकर्स तर अगदी छोट्या-मोठ्या रांगोळ्यांचेसुद्धा स्टिकर्स उपलब्ध आहेत. अलीकडे थ्रीडी डिझाईन असलेल्या रांगोळीला पसंती मिळत आहे.

# वलगाव येथे चोरट्यांनी एटीममधुन बॅटरी केली लंपास

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५ अमरावती**

अमरावती तालुक्यातील वलगाव येथे धक्कादायक घटना उघडकीस आली आहे वलगाव येथे शबनम पान पॅलेसच्या बाजूला India 1 Mo ATM आहे याचं -ढच् चे मेन केबल कापून चोरट्यांनी एटीएममधील बॅटरी चोरून नेली आहे सुत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार हे चोर -ढच् फोडून त्यातील पैसे चोरुन नेण्याच्या तयारीत होते मात्र चोरट्यांचा डाव फसला व चोरट्यांनी -ढच् मधील बॅटरी लंपास केली हि सर्व घटना रात्रीच्या सुमारास घडली असावी असा अंदाज वर्तविला जात आहे



या सर्व घटनेची माहिती मिळतात खपवळर १ -ढच् बँकेचे सर्व अधिकारी कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले व त्यांनी आजूबाजूच्या परिसरात विचारणा केली अद्यापही बँकेच्या अधिकाऱ्यांनी व एटीएमच्या कर्मचाऱ्यांनी वलगाव पोलिसांकडे तक्रार दाखल केली नाही सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार चोरटे एटीएम च्या कॅमेरात चोरी करतानां कैद झाले आहे.

# दिवाळी सणामुळे भंगार व्यवसायाला आले सुगीचे दिवस

## कुटुंबाला आधार : अनेकांना मिळतोय हंगामी रोजगार, दिवसाकाठी लाखोची उलाढाल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती**

दिवाळी सणानिमित्ताने प्रत्येकघरी स्वच्छता व साफसफाई करून रंगरंगोटी केली जाते. घरातील जुन्या व अडगळीत ठेवलेल्या कालबाह्य वस्तु, जुनी पुस्तके, रद्दी व भंगार यांची विक्री केली जाते. या भंगार खरेदी-विक्रीच्या व्यवसायातून अनेकांना हंगामी रोजगार उपलब्ध झाला आहे. अनेकांच्या नजरेत भंगार व्यवसायाला विशेष प्रतिष्ठा नाही. परंतु, या व्यवसायात दररोज लाखो रुपयांची उलाढाल होत आहे. त्याचप्रमाणे गरीब, गरजू व अल्प शिक्षित बेरोजगारांना या माध्यमातून रोजगार उपलब्ध झालाआहे. बाराही महिने गावागावांत हातठेल्यावर फिरून भंगार गोळा केले जाते. दरम्यान, दिवाळीच्या काळात घरगुती, व्यावसायिक प्रतिष्ठाने, गॅरेज, वेल्डिंग वर्क तसेच मशीनरीची कामे करणाऱ्या दुकानांतून बरेच भंगार बाहेर पडते. कापड, किराणा दुकानातून खर्डा, प्लास्टिकचे रिकामे डबे, बरण्या मोठ्या प्रमाणात उपलब्ध होतात. दिवाळीच्या पार्श्वभूमीवर घरात स्वच्छता मोहीम राबविली जाते. यात घरातील बरेच भंगार साहित्य व रद्दी विकल्या जाते. भल्या पहाटेच कटला,ऑटो घेऊन शहरात हाक देत सध्या हे भंगार गोळा करणारे फिरत आहेत. शाळा शिकणारे शहरातील गल्लीबोळात, वसाहतीत फिरून रद्दी, प्लास्टिक व लोखंडी भंगार गोळा करतात. हे भंगार ठोक विक्रेत्याला विकले जाते. दिवाळीमुळे सध्या हा व्यवसाय तेजीत असून, या भंगारामधून दिवसाकाठी लाखोची उलाढाल होत असल्याचे दिसत आहे.



# संतप्त युवा स्वाभिमानाच्या कार्यकर्त्यांनी मनपा आयुक्तांच्या दालनात फेकला कचरा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५ अमरावती**

दिवाळीच्या तोंडावर अमरावती शहरात बडनेरा व अमरावती शहरामध्ये पसरलेले घाणीचे साम्राज्र व नियमीत साफ सफाई होत नसल्यामुळे रोगराई पसरत असून रुणांचा जिव जात आहे नागरीकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झालेले आहे. त्यामुळे आक्रमक झालेल्या युवा स्वाभिमानाच्या कार्यकर्त्यांनी आज मनपा आयुक्तांच्या कक्षात आज कचरा फेकून निषेध व्यक्त केला.

हिंदुचा सर्वांत मोठा सण म्हणुन दिवाळी मोठया उत्साहात साजरी केल्या जाते. तसेच घरा- घरातली साफ सफाई स्वत नागरीक करीत आहे. यामध्ये दिवाळीच्या तोंडावर अमरावती व बडनेरा शहर महानगरपालिकेच्या व कंत्राटदाराच्या हलगर्जीपणामुळे संपुर्ण ठिकाणी घाणीचे साम्राज्य पसरलेले आहे. नाली मोठया प्रमाणात भरलेल्या आहे नाल्याची साफ सफाई सुध्दा होत नाही आहे. शहरातील प्रमुख - प्रमुख चौकामध्ये साफ सफाई होत नाही परिणामी डेंगु, चिकनगुणीया, मलेरीया व इतर आजार पसरलेले असून अनेक रुणांचे जिव गेले आहे व मोठ्या प्रमाणात उपचार घेत आहे. ज्या-ज्या भागामध्ये असे झालेले आहे. त्या ठिकाणच्या कंत्राटदारावर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा व तसेच यासंबधी असलेले कंत्राटदाराचा कंत्राट रद्द करण्यात यावा.अशी मागणी युवा स्वाभिमानाच्या वतीने आज करण्यात आली यावेळी पराग चिमोटे,चंद्रशेखर जावरे,अनुप अग्रवाल अनुप खडसे,सुरज मिश्रा,सद्दाम हुसेन,विशाल निघोट,सोपं बोरकर,राजा वाघाडे श अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.



# रजा केल्या रद्द; जिल्ह्याबाहेरील अनेक अधिकारी देताहेत सेवा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५ अमरावती**

गणेशोत्सव,नवरात्रोत्सवानंतर यंदाची अमरावती पोलिसांची दिवाळी निवडणुकीच्या बंदोबस्तात आणि धावपळीत जाणार आहे. पोलिसांच्या रजा, सुट्या २५ नोव्हेंबरपर्यंत रद्द करण्यात आल्या आहेत. त्यामुळे पोलिस अधिकारी, कर्मचारी यांच्या कुटुंबीयांना कुटुंबप्रमुखाशिवाय सण साजरा करावा लागणार असे चित्र दिसते. विशेष म्हणजे जिल्ह्याबाहेरील बहुतांश पोलिस अधिकारी नक्षलग्रस्त गडचिरोली जिल्ह्यात सेवा देत आहेत.

लोकसभा निवडणुकीत जवळपास दोन महिने पोलिस बंदोबस्तात व्यस्त होते. त्यानंतर थोड्या दिवसाची विश्रांती मिळाली. पुन्हा गणेशोत्सवात पोलिस यंत्रणा बंदोबस्तासाठी रस्त्यावर उतरल्याचे चित्र पाहायलामिळाले. त्यानंतर नवरात्रोत्सवाचा बंदोबस्तही झाला. विधानसभा निवडणुकीची लगबग ऐन दिवाळीत सुरू होणार असल्याचे संकेत मिळाले बत होते. त्यानुसार यंदाच्या दिवाळीतच निवडणुकीची धामधूम सुरू झाली आहे.निवडणूक म्हटली की, उमेदवारांच्या अर्ज भरण्यापासून ते निकालापर्यंत पोलिसांना दक्ष राहावे लागते. कायदा व सुव्यवस्था कायम ठेवून निवडणूक शांततेत पार पाडण्यासाठी पोलिसांना रात्रंदिवस सज्ज राहावे लागते. यंदा तर दिवाळीसणाचा बंदोबस्त आणि निवडणूक दोन्हींकडे पोलिस यंत्रणेला लक्ष द्यावे लागणार आहे. निवडणुका म्हटले की, पोलिसांच्या रजा आणि सुट्या बंद होतात. त्यानुसार यंदाही पोलिसांना सणासुदीच्या काळात कुटुंबीयांकडे लक्ष देता येणार नाही.पोलिस महासंचालकांनी दिलेल्या आदेशानुसार २५ नोव्हेंबरपर्यंत पोलिस अधिकारी व कर्मचारी यांच्या साप्ताहिक सुट्या आणि रजा रद्द करण्यात आल्या आहेत. केवळ वैद्यकीय रजा आणि अत्यावश्यक कारणासाठीच्या रजा घेता येणार आहेत. जिल्ह्यातील तीन विधानसभा मतदारसंघांत जवळपास ४ हजारांहून अधिक पोलिस, होमगार्ड्स, राज्य राखीव दलाचे पोलिस यांचा बंदोबस्त राहणार आहे.

**निकालानंतरच जाणार स्वगावी**

जिल्ह्याबाहेरील रहिवासी असलेले बहुतांश पोलिस अधिकारी लक्ष्मीपूजन कर्तव्याच्या ठिकाणी दरवर्षी करतात. लक्ष्मीपूजनाच्या दुसऱ्या दिवशी चार ते पाच दिवसांच्या रजा काढून दूरवरील स्वगावी जातात. मात्र, यंदा विधानसभा निवडणुकीमुळे रजा मिळणार नाही.